शनिवार, १७ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१२२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SATURDAY 17 DECEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-122 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# दिलासाची चौकशी करण्याचे सीबीआयचे आदेश; एसीबीचा अहवाल मात्र गुलदस्त्यात

## पोलिस आयुक्तांपासून ते पाणी पुरवठा मंत्र्यापर्यंत तक्रारी

सिंचनाचा बट्ट्याबोळ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** केंद्र आणि राज्य शासनाच्या कोट्यवधींच्या झालेल्या पाणी पुरवठा योजनेतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी पोलिस आयुक्तांपासून ते पाणी पुरवठा मंत्र्यांपर्यंत पुराव्यासह तक्रारी दाखल करण्यात आल्या. परिणामी याची दखल थेट पुणे येथील सीबीआय कार्यालयाने घेतली. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीचे आदेश औरंगाबाद लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला देण्यात आले. परंतु या प्रकरणाची संपूर्ण चौकशी केल्यानंतर अद्यापही तो अहवाल गुलदस्त्यात आहे. त्यामुळे या घोटाळ्याची व्याप्ती किती मोठी आहे, याची प्रचिती येते. या प्रकरणी नव्याने चौकशी करण्याची मागणी सीबीआय व पाणी पुरवठा मंत्र्याकडे करण्यात आली आहे. प्रकरणातील तथ्य तपासून दोषींविरूद्ध कारवाई केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. *(सविस्तर पान-3 )*

# जो पियेगा, वो मरेगा !

## दारु पिऊन मृत्यू झाल्यास भरपाई नाही : नितीश कुमार

आधुनिक केसरी न्यूज

**पाटना : दारु पिऊन मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही भरपाई दिली जाणार नसल्याचे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी विधानसभेत बोलताना जाहीर केले आहे. आम्ही नेहमीच मद्यप्राशन करू नका, मृत्यू होईल, असे आवाहन करत आहोत. मद्यप्राशनाच्या बाजूने बोलणारे तुमचे काही भले करू शकत नाहीत, असे नितीश कुमार म्हणाले.**



विषारी दारू प्राशन केल्याने बिहारमध्ये ५३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यातच मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी 'जे लोक बनावट दारू पितात, त्यांचा मृत्यू होणारच' असे विधान केल्याने विरोधकांनी त्यांना लक्ष्य केले. नितीश कुमार यांच्या वक्तव्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली. नितीश कुमार मात्र आपल्या भूमिकेवर ठाम असून ही माझी वैयक्तिक इच्छा नसून राज्यातील महिलांच्या आक्रोशाला प्रतिसाद आहे, असे सांगितले.

संसदेतही हा मुद्दा उपस्थित करणाऱ्या भाजपा खासदारांवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. मात्र भाजपासह अन्य पक्षांनी नितीश कुमार यांच्या दारू धोरणावर जोरदार टीका केली. विरोधी पक्षांनी सलग दुसऱ्या दिवशी विधानसभेत गोंधळ घातला. तर बिहारमधील महाआघाडी सरकारला पाठिंबा देणाऱ्या सीपीआय (एमएल) लिबरेशनने पुनरावलोकनाची मागणी करत कामकाज सुरू होण्यापूर्वी सभागृहाबाहेर निदर्शने केली.

# लोक त्यांना गांभीर्याने घेत नाहीत : देवेंद्र फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** त्यांच्या पक्षावर लोकांचा विश्वास उरलेला नाही, म्हणून लोकं जर दुसऱ्या पक्षात गेले तर ते दलाल?, कालपर्यंत ते चांगले आज ते दलाल. मला असे वाटते की ही जी भाषा ते वापरतात, आता लोकांना या भाषेचा रागदेखील येतो आणि लोक त्यांना गांभीर्याने घेतही नाहीत.



नाशिकमधील शिवसेना (ठाकरे गट) नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. यावर शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी जे तिकडे गेले ते सगळे दलाल आहेत आणि ते आपल्या कामासाठी गेलेले आहेत, असे म्हटले होते. यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ही प्रतिक्रिया दिली. गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत तुमची जी बैठक पार पडली, यावर बोलताना शिवसेना(ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे असे म्हणाले आहेत की, यामध्ये काही नवीन घडले नाही, असे म्हणत माध्यम प्रतिनिधींनी यावर फडणवीसांना प्रश्न विचारला असता यावर फडणवीस म्हणाले की, ते होते ना अडीच वर्षे त्यांनी काय नवीन घडवले? एका बैठकीत नवीन घडेल, असे कधीच होत नाही.

# प्रचाराच्या तोफा थंडावल्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील विविध जिल्ह्यांतील 7 हजार 751 ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी 18 डिसेंबर 2022 रोजी मतदान होणार आहे. आज प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून आता रविवारी होणाऱ्या मतदानाकडे सर्वांचं लक्ष आहे. या निवडणुकीचा निकाल 20 डिसेंबर रोजी लागणार आहे. अहमदनगर- 203, अकोला- 266, अमरावती- 257, औरंगाबाद- 219, बीड- 704, भंडारा- 363, बुलडाणा- 279, चंद्रपूर- 59, धुळे- 128, गडचिरोली- 27, गोंदिया- 348, हिंगोली- 62, जळगाव- 140, जालना- 266, कोल्हापूर- 475, लातूर- 351, नागपूर- 237, नंदुरबार- 123, उस्मानाबाद- 166, पालघर- 63, परभणी- 128, पुणे- 221, रायगड- 240, रत्नागिरी- 222, सांगली- 452, सातारा- 319, सिंधुदुर्ग- 325, सोलापूर- 189, ठाणे- 42, वर्धा- 113, वाशीम- 287, यवतमाळ- 100, नांदेड- 181 व नाशिक- 196. एकूण- 7,751 आदी ग्रामपंचायतीसाठी मतदान होत आहे. मतदारांची प्रत्यक्ष भेट होत नसेल तर फोन, मेसेजद्वारे भूमिका पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# 'त्या' गृहस्थांबद्दल आज ना उद्या निर्णय घ्यावा लागेल : पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यपालांनी ज्या पद्धतीचे उद्गार



शिवछत्रपतींबद्दल काढले ते चुकीचे होते. मला खात्री आहे आज ना उद्या केंद्र सरकारला निर्णय घ्यावा लागेल, असे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले. शनिवारचा मोर्चा सत्ताधाऱ्यांनी महापुरुषांविरोधात केलेल्या वक्तव्याचा निषेध म्हणून असेल. यामध्ये सर्वसामान्यांचा संताप दिसेल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविरोधात वक्तव्य करणाऱ्यांविरोधात कारवाई न करता, केंद्र आणि राज्य सरकारने केवळ बघ्याची भूमिका घेतली, असा आरोपही शरद पवारांनी केला.

मोर्चासाठी परवानगी मिळाली याबाबत मला आश्चर्य वाटत नाही. लोकशाहीमध्ये आपले मत मांडण्याचा अधिकार आहे, हे काल मुख्यमंत्री म्हणाले होते. केंद्र सरकार आणि राज्य सरकार दोघांची बघ्याची भूमिका आहे याबद्दल लोकांच्या मनात संताप आहे. मी मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य ऐकले होते, ते म्हणाले होते मोर्चा हा लोकशाहीत अधिकार, त्यामुळे परवानगी मिळेल यात शंका नव्हती. एकच आहे, लोकांमध्ये राग आहे, डॉ. आंबेडकर, शिवाजी महाराज, महात्मा फुले यांच्याबाबत जबाबदार माणसांनी केलेली वक्तव्ये सामान्य माणसांना अस्वस्थ करणारी आहेत. त्याची प्रतिक्रिया उद्या मोर्चात दिसेल. उदयनराजेंनी भूमिका चांगली घेतली. त्याबाबत समाधान आहे. पण राज्य सरकार आणि केंद्र सरकारने जी काळजी घ्यायला हवी होती ती घेतली नाही. त्यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली.

# वाहरे बाजार समिती तेरा कमाल, गरिबोंके रेशनपे हो गये व्यापारी मालामाल

## लासूरच्या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात खुलेआम खरेदी होतोय रेशनचा गहू -तांदूळ

आधुनिक केसरी न्यूज

गुलाब वाघ

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन हे स्वस्त धान्य दुकानातील गहू, तांदूळ,तर सोडाच पण लहान बालकांना दिला जाणाऱ्या शालेय पोषण आहारातील हरभरा, विविध डाळी, यांचा काळा बाजार करणारे प्रमुख ठिकाण बनत चालले असून याठिकाणावरून परराज्यात स्वस्त धान्य दुकानातील धान्य तस्कारांची टोळी अवतरली असून गरिबांच्या धान्यवार डल्ला मारून लाखो रुपयांची माया जमवत आहे यावर नियंत्रण ठेवणारा अन्न भेसळ व महसूलचा पुरवठा विभाग मात्र अर्थपूर्ण धोरण स्वीकारत असून कारवाई करत नसल्याने लासूरला सावंगी चौक,मयुरी पेट्रोल पंप,लासूर स्टेशन शहरातील मुख्य रस्ता,गल्लीबोळात अशी दुकानें थाटली आहे त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा परवाना नाही हे विशेष आहे हे कमी कीं काय म्हणुन लासूर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भुसार मार्केटच्या काही व्यापारी आस्थापनात सर्रासपणे व्यापारी तांदूळ,गहू खरेदी करत असून लाखो रुपयाची माया कमवली आहे मात्र याचा बाजार समितीला कवडीचाही फायदा नाही कारण तांदळाची मार्केट फी बाजार समितीला मिळत नाही व तसा लिलावाचा अधिकारही बाजार समितीच्या आवारात व्यापाऱ्याला नाही. लासूर स्टेशनला रेशनच्या गहू व तांदळाला सोन्याचा भाव मिळत असून गहू चोवीस ते पंचवीस रुपये तर तांदूळ वीस रुपये प्रतिकिलो भावाने हे व्यापारी खरेदी करत आहेत प्रत्यक्षात रेशन दुकानावर गहू तीन तर तांदूळ दोन रुपये प्रतिकिलो दराने लाभार्थ्याला दिला जातो.





**गहू – तांदळाला सोन्याचा भाव**

लासूर स्टेशन येथे खुलेआमपने मुख्य रस्त्यावर स्वस्त धान्य दुकानातील गहू तांदूळ खरेदी केला जातो या दुकानदाराकडे कुठल्याही प्रकारचे आडत . दुकानाचे सरकारी लायसन्स नाही वजनकाटे प्रमाणित नाहीत मात्र तहसीलचा पुरवठा विभाग, अन्न, भेसळ प्रशासन, वजन मापे निरीक्षक, शॉप ऍक्ट अधिकारी या विभागाचे वर्तन असून अडचण नसून खोळंबा अशी झालेली आहे व कुठल्याही प्रकारची कारवाई अर्थपूर्ण हेतूने या विभागाचे अधिकारी व कर्मचारी एकप्रकारे या तस्कारांना पाठीशी घालत आहे या दुकानात गेल्यावर रेशनचा तांदूळ असल्यास त्याचा भाव विचारायचा असल्यास "व्हाईट" किंवा "ढवळा" असा सांकेतिक कोडं सांगून भाव विचारावा लागतो .

बाजार समितीचे प्रशासक यांना दै . आधुनिक केसरीच्या प्रतिनिधिनी संपर्क साधला असता चौधरी यानी सांगितले कीं तांदूळ किंवा गहू कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डमध्ये लीलावाच्या यादीत आहेत कीं नाही हे तपासावे लागेल असे मोघम उत्तर दिले मुळात काळ्या बाजारात विकणारा रेशनचा गहू, तांदूळ बाजार समितीच्या यार्डमध्ये कसा घेता येऊ शकतो हाही यक्षप्रश्न आहे यानंतर बाजार समितीच्या आवारात गहू, तांदूळ खरेदी करणाऱ्याचे नाव सांगा असेही चौधरी यांनी केसरीच्या प्रतिनिधीना विचारले .

**किरण चौधरी (प्रशासक, लासूर स्टेशन बाजार समिती)**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# जगातील पहिले प्रेमपत्र

आधुनिक केसरी



पत्र लिहिणे आणि ते श्रीकृष्णाला पाठवणे आणि नंतर त्याच्यासोबत पळून जाऊन विवाह करण्याचे धाडस दाखवणे या तिच्या कृतीचे, गुणांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. आपल्या पत्रात ती श्रीकृष्णाला म्हणते " हे भुवनसुंदरा, जेव्हापासून मी तुझे गुण ऐकले आहेत, तेव्हापासून मी तुझ्या प्रेमात पडले आहे. आणि तुला समर्पित झाले आहे. तू माझे हरण करून घेऊन जा. तुझ्यासारख्या सिंहाचा भाग शिशुपालरूपी कोल्हा नेतो आहे असे कदापि होऊ नये. साधना, संस्कार, प्रीती, भक्ती इत्यादि धन घेऊन मी येईन. मी सतत तुझी पूजा करून काही पुण्यकृत्ये केली आहेत, आणि मनाने तुला वरले आहे. आता प्रत्यक्षात माझा स्वीकार कर. अंबेच्या देवळात मी गौरीपूजेसाठी जाईन, तेव्हा तू माझे मंदिरातून हरण कर. आणि पराक्रमाने शिशुपालादिकांना हरवून राक्षसविधीने माझे पाणिग्रहण कर. तू आला नाहीस तर मी समजेन की माझ्या साधनेत काही कमतरता राहिली असेल. तू मला या जन्मी लाभला नाहीस तर मी प्राणत्याग करीन, पण जन्मोजन्मी तुझी वाट पाहीन, आणि अंती तुझीच होईन !!" या पत्रातला मला आवडलेले वाक्य म्हणजे ती श्रीकृष्णाला म्हणते , " साधना, संस्कार, प्रीती, भक्ती इ धन घेऊन मी येईन. " किती सुंदर विचार. आणि लाख मोलाचे धन. पैसा नाही, हुंडा नाही, वस्तू नाही. तर साधना, संस्कार, प्रीती आणि भक्ती या सुंदर भावना हेच धन. आणि तेच ती घेऊन येते. आणि श्रीकृष्ण जिचा सखा आहे, पती आहे तिला आणखी काय हवे ? आणि त्या श्यामसुंदराला सुद्धा कशाची अपेक्षा असते ? तुमची साधना महत्वाची. संस्कार महत्वाचे. प्रीती आणि भक्ती महत्वाची. तुम्ही भक्तिभावाने आपले हृदय त्याला अर्पण करा, म्हणजे तो रुख्मिणीप्रमाणे तुमचेही हरण करील. तुम्ही त्याचे होऊन जाल. हाच तर या पत्रातला आपल्या सगळ्यांसाठी संदेश आहे, नाही का ? **क्रमशः**



## आनंदी पहाट

# मूल्य आणि अध्यात्म अभ्यासणे आवश्यक

आधुनिक केसरी

आपल्या जीवनाचा अर्थ जाणून घेणे हे बहुतेकांसाठी आध्यात्म महत्त्वाचे असण्याचे मुख्य कारण आहे. आध्यात्मवाद, काहीतरी पवित्रता शोधण्यासाठी, लोकांना एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करते. एक व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात यावर चिंतन केल्याने सर्वसाधारणपणे मानवी अस्तित्वाचा अर्थ काय याविषयी तुमचे ज्ञान वाढू शकते. प्रार्थना, मंत्र आणि ध्यान यांसारखे आध्यात्मिक आरोग्य लागू करण्याचे अनेक मार्ग आहेत. आध्यात्मिक विकास हा अंशतः एखाद्याचा अंतर्बाह्य गतिमान प्रवास परस्पर प्रक्रिया आहे. या क्रमिक वाढीमध्ये सामान्यतः विकासाच्या तीन टप्प्यांचा समावेश होतो; शुद्धीकरण अवस्था, प्रकाशमय अवस्था आणि एकात्मक अवस्था ह्या होत. आपल्या मानवी विकासाच्या टप्प्यांचे ते प्रतिबिंब दाखवतात जसे, बालपण, किशोरावस्था आणि प्रौढत्व ही होय. आपल्या आध्यात्मिकतेत आपण स्वतः आपल्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवनाचा प्रवास करत असतो. अध्यात्म आपल्याला शांतता, जीवनाचा उद्देश आणि क्षमा या भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणावाच्या वेळी किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे बनते. अर्थाच्या निर्मितीमध्ये आध्यात्मिक मूल्यांमध्ये ऊर्जा, विकास आणि आशा यांचा स्त्रोत निर्माण करणे समाविष्ट आहे. आध्यात्मिक वास्तवाला अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींसाठी अंतिम अर्थ-निर्माता मानले जाऊ शकते. आध्यात्मिक वास्तवाची मानवी भावना सर्व ज्ञात संस्कृतींमध्ये आहे. नैतिक आरोग्य म्हणजे एखाद्या व्यक्तीची योग्य आणि चुकीची जाणीव, नैतिक पद्धतीने वागण्याची त्यांची क्षमता प्रतीत करत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## सत्कर्माचे फळ | मोक्ष प्राप्ती

टाळासंगे बोले | मृदुंगाचा ताल ||
जगण्याचे मोल | अभंगात ||१||
भजनात डोले | सावळा श्रीरंग ||
त्रैलोक्याचा रंग | पांडुरंग ||२||
कर्मासंगे भाव | भावासंगे भक्ती ||
अंतरीची शक्ती | हरिनाम ||३||
मौनात पूजावे | नाम सर्वकाळ ||
सत्कर्माचे फळ | मोक्ष प्राप्ती ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

### भक्ती

कुर्वन्ती त्वं स्मितं हास्यम्आ याहि देवि सत्वरम् । स्वप्ने चापि सुषुप्तौ च जागृत्यामपि सर्वथा ।।५।। हे देवी, स्मित हास्य करीत तू लवकर ये. जागृती, सुषुप्ती आणि स्वप्नातही तुझे ध्यान व्हावे. अर्थात ध्यानात ध्येय तूच असावेस.

## ।। दासबोध स्तवन ।।



# चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

समास तिसऱ्याच्या शेवटाकडे आपण आलो आहोत अत्यंत वैचारिक मुद्दे समर्थांनी आपल्याला पटवून दिले आहेत. 44 ते 53 व्या ओवीतील निरूपणाकडे आपण जाऊया - मन नेहमीच चंचल असते. त्याच्या मध्येखुप मोठा बदल होऊन मनाचा मी पणा कमी झाला की निवृती अनुभवायला मिळते. निवृती अवस्थेलाच ऊन्मनी अवस्था असे म्हणतात. ही अवस्था शब्दांच्या पलीकडे असते. या अवस्थेत कोणतेही बंधन नाही. मर्यादा, भेद,परिच्छिन्नपणा नाही सर्व गुणधर्म इथे गळून पडतात. या अवस्थेत योगी विश्रांती घेत असतात. उपाधिशून्य सद्वस्तु स्वतः बनणे म्हणजेच सहज समाधी होय. समाधी अवस्थेत संसारातील दुःख देणारे सर्व आधीव्याधी गळून पडतात. सर्व उपाधींचा शेवट होणे म्हणजे सहज साक्षात्कार होय.वेदांताचा अखेरचा सिध्दांत हाच आहे. पूर्वपक्ष,उत्तरपक्ष करून सिध्द करणारे निश्चित तत्व म्हणजे आत्माच आहे. सर्व ब्रम्हांडाचे म्हणजे उपनिशदे,ब्रम्हसुत्रे आणि भगवत् गीता यांचे प्रमेय आत्मस्वरूपचं आहे. सर्व सिध्द लोकांचा हा अनुभव आहे. अशा प्रकारे चौदा ब्रम्हाचें निरसन आपण या समासात अभ्यासले. उपाधिरहित, केवळ, शुध्दब्रम्ह याचा सारांश पुढील प्रमाणे मांडता येईल . जे शाश्वत ब्रम्ह आहे त्याठिकाणी मायेचा भ्रम नाही, अज्ञान नाही, दृश्याचा स्पर्श नाही, कल्पना नाही. जे पुरूष शुध्द ब्रम्हाचा साक्षात अनुभव घेतात त्यांनाच परब्रम्हाचेस्वरूप कळते. देहाच्या पलिकडे त्यांची अवस्था असल्याने "मी देह आहे "ही कल्पनाच त्यांच्या ठिकाणी गौण असते. देहबुद्धी नष्ट झाल्यामुळे त्यांना जिकडेतिकडे ब्रम्ह स्वरूप आहे असे दिसते. देहबुद्धीची कल्पना नाहिशी करण्यासाठी निर्विकल्प बनल्यावर आपण मी पणाचे नसुनसुध्दा आत्मस्वरूपाने अनंतकाळ रहातो. थोडक्यात काय तर मी म्हणेन देव पहाच पण त्याचे देवत्व आपल्यात कसे येईल हे पहा. तिर्थस्थळी यात्रा करा पूर्वी पेक्षा आता ते सहज शक्य झाले आहे. अत्यंत आधुनिक साधनाद्वारे आपण तिर्थाटन करू शकतो. हा बदल निश्चितच वंदनीय आहे. हारफुले पेढे वाटले ,खुप लाखो रूपयांच्या देणग्या दिल्या तर देवस्थानांचा ऊध्दार होणार यांत शंका नाही. पण त्या देवाचे देवत्व अजूनही आपल्यात यावे असा प्रयत्न करणे ही खरी गरज आहे. जे निःसंग आहे त्याची भेट घेण्यास गेलेला स्वतः निःसंग बनावा तसेच निर्विकल्प, निराकार कल्पने रहित असल्याने त्याची कल्पना करू गेल्यास स्वतः कल्पनाच निर्विकल्प बनते. परब्रम्ह हे एखाद्या दृष्य पदार्थासारखे नाही ते उचलून वस्तुप्रमाणे हातात देता येत नाही. मित्रांनो सद्‌गुरूंचा सहवास लाभावा,त्यांच्या मुखाने ब्रम्हस्वरूप श्रवण करून आपण त्याचा अनुभव घ्यायचा असतो. आपल्यात देवत्व येऊ द्यायचे असते ही समर्थांची खरी शिकवण आहे. श्रीराम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ चतुर्दशब्रम्हनिरूपण समास तिसरा ( दशक सातवे ) समाप्त




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# गोंदवल्याचे महत्त्व नामाच्या प्रेमात आहे

आधुनिक केसरी

ज्याप्रमाणे एखादा बाप बॅंकेत पैसे ठेवतो आणि त्याचे व्याज आपल्या मुलाला आपल्या पश्चात् मिळण्याची व्यवस्था करतो, त्याचप्रमाणे, ज्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे त्यांना, निदान अंतकाळी तरी, सद्‌बुद्धीचे व्याज मिळण्यासाठी भरपूर भांडवल मी गोंदवल्यास ठेवले आहे. मनुष्य कितीही भ्रष्ट बुद्धीचा झाला तरी गोंदवल्याला आला की त्याच्या बुद्धीचा पालट झालाच पाहिजे. निदान अंतकाळी तरी तो तिथे येऊन चांगला मरेल. अभिमान म्हणून नव्हे, परंतु गोंदवल्याचे महत्त्व कशात असेल तर ते नामाच्या प्रेमात आहे. राम किती दयाळू आहे ! त्याच्या नामाचा प्रसार व्हावा म्हणून त्याच्या नावाने मी हा बाजार मांडला. पहिल्याने वाटले, आपला माल खपेल की नाही कुणास ठाऊक ! पण रामाने मोठी कृपा केली, आणि पुष्कळ लोक नामाला लागले. आपण पाहतो, प्रत्येक गावाला निरनिराळे नाव असते. तसे पाहिले तर सर्व गावे सारखीच; घरेदारे, भिंती, शाळा, धर्मशाळा, चावड्या या प्रत्येक गावात असतात. परंतु प्रत्येक गावाचे महत्त्व काही वेगळे असते. गोंदवल्यास पैशाचे महत्त्व नाही, परंतु तिथे नामाचे पीक भरघोस आहे. मी नेहमी हेच सांगत असतो की, 'जिथे जे उगवेल तेच तुम्ही पेरा.' इथला कोणताही भक्त कुठेही जरी दिसला, तरी त्याच्या वागण्यावरून कळून आले



पाहिजे की, हा गोंदवल्याचा भक्त असला पाहिजे. त्याचे तोंड सारखे हलते आहे, तोंडाने रामाचा जप चालू आहे, त्याअर्थी हा अमक्या गुरूचा शिष्य असला पाहिजे, असे कळून यायला हवे. म्हणतात ना, की आपल्या वडिलांचे महत्त्व सांगू नये, ते मुलाच्या कृतीवरून कळले पाहिजे. म्हणून आता एकच करा, रामाला हात जोडून मनापासून सांगा, " रामा ! तुझे प्रेम असू दे, आम्ही अखंड नामात राहू. प्रारब्धाचे भोग आम्ही आनंदाने भोगू, आणि तू ठेवशील त्यात आनंद मानू. तुझे गोड नाम आम्ही हृदयात सतत जतन करून ठेवू." राम खात्रीने कृपा केल्यावाचून राहणार नाही. खरोखर, या नामामध्ये आपला प्रपंच आपल्या कल्पनेपेक्षा कितीतरी सुखाचा होईल ! लढाई करणे हे अर्जुनाचे कर्तव्य असल्याने, 'तू माझे स्मरण ठेऊन लढाई कर,' असे भगवंतांनी सांगितले. आज नोकरी किंवा प्रपंच करणे हे आपले कर्तव्य आहे; तेच आपण भगवंताच्या स्मरणात करू. नीतिधर्माचे आचरण, आणि प्रारब्धाने आलेली कामे भगवंताच्या स्मरणात करणे, हेच सर्व धर्माचे, शास्त्रांचे सार आहे. आपण साखर खाल्ली तर आपल्याला गोड लागते, त्याचप्रमाणे आपण गोड शब्द बोललो की आपल्याला गोड शब्द ऐकायला मिळतात. आपल्या सर्व गोष्टी जर भगवंताच्या नामात झाल्या, तर भगवंताचे प्रेम आपल्याला का बरे मिळणार नाही ? आपण भगवंताचे नाम घ्यायला सुरुवात करू या. तेच नाम भगवंताची प्राप्ति करून द्यायला समर्थ आहे याची खात्री बाळगा. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव खासच आनंदमय आहे.

आजचे बोधवचन आहे - जो माझा म्हणवतो त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

# कोरे फॉर्म, चेक व व्हाऊचरवर घ्यायचे सह्या


## महाराष्ट्रात कुठेही काम झाले तरी निधी औरंगाबादच्या एस.बी.एच. व सेंट्रल बँकेत व्हायचा जमा

आधुनिक केसरी न्यूज

दिलासा जन विकास प्रतिष्ठान ही संस्था १९९० च्या सुमारास उदयास आली. याचे काम संजीव उन्हाळे व अनघा पाटील हे बघत होते. औरंगाबादेतील महालपिंप्री व कच्चेघाटी येथून त्यांनी पाणलोट क्षेत्रात काम करण्यास सुरूवात केली. संस्थेचा पुढे पसारा महाराष्ट्रभर वाढत गेला. संस्थेच्या वतीने गावातील पाणलोट कमेटीच्या कोऱ्या फॉर्मवर सह्या घ्यायचे व पाणलोट समितीच्या अध्यक्ष व सचिवांच्या कोऱ्या चेक व व्हाऊचरवरही सह्या घ्यायचे. तसेच गावात तुटपुंजे काम करुन त्यात गावातील रहिवाशांचे श्रमदान करुन घेतले जात होते. संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बोगस कागदपत्रांच्या आधारे गावातील रहिवाशी दाखवून पाणलोट समितीचे अध्यक्ष व सचिव बनवत होते. हे कर्मचारी बोगस कागदपत्रांच्या अधारे अनेक ठिकाणचे अध्यक्ष व सचिव होते. प्राप्त होणारा संपूर्ण निधी हा त्यांच्या खात्यावर जमा व्हायचा. विशेष म्हणजे महाराष्ट्रात कुठेही काम झाले तरी सर्व निधी हा औरंगाबादच्या रेल्वेस्टेशन येथील एस.बी.एच. बँकेत व सेंट्रल बँक, मोंढा नाका येथेच जमा व्हायचा, असे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

**अहवाल मात्र गुलदस्त्यात–** संबंधित तक्रारीची दखल एस.पी. सीबीआय पुणे कार्यालयाने घेतली होती. हे प्रकरण सीबीआय अधिकाऱ्यांनी तीन तास समजवून घेतले होते. या प्रकरणाला गांभीर्याने घेत याची संपूर्ण चौकशी करण्याची जबाबदारी औरंगाबाद लाचलुचपत विभागाला वर्ग करण्यात आली होती. दरम्यान या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली. मात्र या प्रकरणात दिलासा संस्थेबाबतचा अहवाल अजून गुलदस्त्यात आहे. या प्रकरणी चौकशी अहवाल तत्काळ जाहीर करावा व दोषींविरुध्द कारवाई करावी, अशी मागणी सीबीआय पुणे कार्यालयाला नव्याने करण्यात आली आहे. अन्यथा या प्रकरणी न्यायालात जाण्याची तयारी तक्रारदार यांनी केली आहे.

**अशी केली होती कारवाईची मागणी** : अनधिकृत पध्दतीने औरंगाबादेतील बँकेत जमा झालेल्या पैशांची चौकशी करुन ते खाते सिल करुन चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली होती. तसेच संस्थेने गैरकारभार केल्याचे उघड झाल्यानंतर अधीक्षक अभियंता यांनी दिलासा जन विकास प्रतिष्ठान संस्थेचा प्रस्ताव विखंडीत केला होता. संस्थेची चौकशी करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी देखील करण्यात आली होती.


CENTRAL BUREAU OF INVESTIGATION
ANTI CORRUPTION BRANCH
KENDRIYA SADAN "A" WING AKURDI PUNE-411044.
PH-(020-27642501/03/04) FAX- 020-27642502.

SECRET
DP 122/CE/170/2015/CBI/PUNE 3388 Date: 13/10/2015

To,

The Supdt. of Police,
Anti Corruption Bureau,
Old Tehsil Office Bldg.,
Opp. Main Post Office,
Old Bazar,
Aurangabad.

Sub – Forwarding of complaint –reg.

Sir,

Please find enclosed herewith the following complaint in original for taking necessary action at your end.


| Sl. No. | Complaint No. | Name of the complainant | Dt. of complaint |
|---|---|---|---|
| 1 | CE/122/2015/170/Pune | Shri Popat Asaram Chandwade, Kaccheghati Post, Varud (Kaji), Dist. Aurangabad | 22.9.15 |

CBI, ACB, Pune has not made any enquiry into this complaint.

CBI, ACB, PUNE

Yours faithfully
16/10/15
HEAD OF BRANCH
CBI: ACB: PUNE
O/c.

Encl. Original Complaint Copy.
Copy forwarded to Shri Popat Asaram Chandwade, Kaccheghati Post, Varud (Kaji), Dist. Aurangabad for information please.


प्रति,
मा. S.P.C.B.I.
सी.बी.आय. पुणे.

विषय : दिलासा जनविकास प्रतिष्ठान या संस्थेच्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होऊन कार्यवाही होणे बाबत...

अर्जदार: पोपट आसाराम चंदवाडे

सीबीआय कार्यालयाला तक्रार दिल्यानंतर औरंगाबाद एसीबीला चौकशीचे आदेश दिल्याचे पत्र.

“

मला कुठल्याही प्रकारची चौकशीची नोटीस आली नाही, किंबहुना माझी चौकशीही झालेली नाही. जर करप्शन झालेच नाही तर चौकशी कशी होणार.

संजीव उन्हाळे, दिलासा जनविकास प्रतिष्ठान




**यांच्याकडे गेल्या तक्रारी**


सर्व पुराव्यांसह या तक्रारी पोलिस आयुक्त, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, एस.पी. सी.बी. आय. पुणे, मुख्य प्रबंधक नाबार्ड पुणे, मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प., संचालक मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे, कृषी आयुक्त पुणे, मुख्यमंत्री सचिव मंत्रालय, मुंबई, मंत्री जलसंधारणमंत्रीचे खासगी सचिव, मुंबई, अध्यक्ष जलसंधारण सल्लागार परिषद, मुंबई, राज्यपाल सचिव मुंबई, महाराष्ट्र मानवाधिकार हक्क आयोग मुंबई, एफ.एस.डी.डी. नाबार्ड मुख्य कार्यालय, मुंबई यांच्याकडे तक्रारी देण्यात आल्या आहेत.



**...तर न्यायालयात जाऊ** : आम्ही या संपूर्ण प्रकरणाच्या भ्रष्टाचाराची माहिती माहिती अधिकारात जमा केली आहे. या संदर्भात महाराष्ट्रातील संपूर्ण विभागांना तक्रारी देखील दाखल केल्या आहेत. परंतु संबंधित व्यक्तीचे प्रस्थ हे मोठे असल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यास कुणी धजावत नाही, हे लक्षात आले आहे. त्याशिवाय सीबीआयने या प्रकरणात चौकशी करण्याचे आदेश दिल्यानंतर देखील माहिती समोर आलेली नाही, त्यामुळे याप्रकरणी आम्ही न्यायालयात दाद मागणार आहोत
**–पोपट चांदवडे, ग्रामस्थ**

# एलएसीवरील परिस्थिती भारताच्या नियंत्रणात

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** तवांगमध्ये भारत-चीन सैनिकांमध्ये झालेल्या चकमकीवर ईस्टर्न कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल आरपी कलिता यांनी आपली पहिली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तवांगमध्ये भारत-चीन सैनिकांमध्ये झालेल्या चकमकीवर ईस्टर्न कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल आरपी कलिता यांनी आपली पहिली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी शुक्रवारी (16 डिसेंबर) सांगितले की, पीएलएने एलएसी ओलांडली, परिणामी याविरोधात दोन्ही बाजूंचे सैनिक जखमी झाले. या प्रश्न स्थानिक पातळीवर सोडवला गेला आहे. यासंदर्भात बुमला येथे फ्लॅग मिटिंग झाली, आता परिस्थिती नियंत्रणात आहे. ईस्टर्न कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल आरपी कलिता पुढे म्हणाले की, लष्करी जवान या नात्याने आपण आपल्या देशाचे रक्षण करण्यास सदैव तयार असतो. शांतता असो वा संघर्ष, बाह्य किंवा अंतर्गत धोक्यांपासून देशाची प्रादेशिक अखंडता सुनिश्चित करणे, हे प्राथमिक कार्य आहे. आम्ही सर्व परिस्थिती आणि आपत्कालीन परिस्थितींसाठी तयार आहोत. लेफ्टनंट जनरल आरपी कलिता कोलकाता येथे विजय दिवसाच्या 51 व्या वर्धापन दिनानिमित्त पुष्पहार अर्पण समारंभात माध्यमांशी बोलत होते. या घटनेबाबतच्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन लेफ्टनंट जनरल आरपी कलिता केले आहे. ते म्हणाले की, मला सांगायला आनंद होत आहे की, स्थानिक पातळीवर त्याचे नियंत्रण आहे. दोन्ही बाजूंच्या जवानांना किरकोळ दुखापत झाली असली तरी, मी तुम्हालाही विनंती करू इच्छितो की कोणत्याही प्रकारच्या अफवांकडे लक्ष देऊ नका. मी तुम्हाला खात्री देऊ इच्छितो की, उत्तरेकडील सीमेवरील सीमावर्ती भागात आमचे नियंत्रण आहे. 9 डिसेंबर रोजी अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमधील यांगत्से येथे चीन आणि भारताचे सैनिक आमनेसामने आले होते. दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये झालेल्या या चकमकीत अनेक जवान जखमी झाले. जखमी जवानांपैकी बहुतांश चीनचे होते. यानंतर दोन्ही लष्कराच्या कमांडर्सनी फ्लॅग मिटिंग घेऊन परिस्थिती हाताळली. त्यानंतर दोन्ही देशांचे सैनिक मागे हटले.

# गुटखा-पान मसाल्यावर विशेष कर लावणार

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** गुटखा पान मसाल्यावर विशेष कर लावण्याचा प्रस्ताव मंत्री गटाच्या समितीने मांडला आहे. मंत्री गटाच्या समितीने गुटखा-पान मसाल्यावर 38 टक्के 'विशिष्ट कर आधारित शुल्क' आकारण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यास सरकारला गुटखा आणि पान मसाला विक्रीतून अधिक महसूल मिळणार आहे. हा कर या वस्तूंच्या किरकोळ किमतींशी जोडला जाणार आहे. सध्या या वस्तूंवर 28 टक्के जीएसटी आकारला जातो आणि त्यांच्या किमतींनुसार नुकसानभरपाई आकारली जाते. वस्तू आणि सेवा कर परिषदेने मंत्री गटाच्या समितीला कर चुकवणाऱ्या वस्तूंवर क्षमतेच्या अनुषंगाने कर लागू करण्यासंदर्भात विचार करण्यास सांगितले होते. यानंतर, ओदिशाचे अर्थमंत्री निरंजन पुजारी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री गटाच्या समितीने आपला अहवाल सादर केला असून गुटखा आणि पान मसाल्यावर 38 टक्के कर लावण्यास सांगितले आहे.

**करचोरीला लगाम लागणार**
समितीन सादर केलेल्या या अहवालाला मान्यता मिळाल्यास गुटखा-पान मसाला पदार्थांवर होणारी करचोरी रोखण्यास मदत होईल. किरकोळ व्यापारी आणि पुरवठादार स्तरावर करचोरी थांबवता येऊ शकते. यासोबतच महसुलातही वाढ होणार असल्याचं मंत्र्यांच्या समितीच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

# महाविकास आघाडीचा मोर्चा हा सरकारला धडकी भरवणारा असेल

## राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा स्पष्ट इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** राज्यपाल व भाजपचे लोक महापुरुषांबाबत अनुउद्गार काढत आहेत. राज्यातील मंत्री खालच्या पातळीवर बोलून महापुरुषांच्या कार्याचा अपमान करत आहेत. आज महाराष्ट्रात प्रचंड बेरोजगारी आहे. यावर तोडगा न काढता बेरोजगारीवर अधिक भर घालण्याचे काम राज्यातील शिंदे टोळी आणि भाजपचे सरकार करत आहे त्यामुळेच उद्याचा महाविकास आघाडीचा महामोर्चा हा सरकारला धडकी भरवणारा असेल असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माध्यमांनी घेतलेल्या मुलाखतीतून दिला. महाविकास आघाडीच्यावतीने शनिवारी आयोजित केलेल्या महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी काही माध्यम प्रतिनिधींना मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी राज्यकर्त्यांवर हल्लाबोल करताना पक्षाची भूमिकाही स्पष्ट केली. महापुरुषांबद्दलच्या वक्तव्यांमागे शंभर टक्के एक अजेंडा आहे. एखादा बुरुज जर पाडायचा असेल तर त्या बुरुजाचा एका - एका दगडावर हल्ला केला जातो. छत्रपती शिवाजी महाराज ही आपली अस्मिता आहे. आपल्या स्वाभिमानावर हल्ला करून हा बुरुज पाडण्याचा प्रकार सुरू आहे. ही वक्तव्य चुकून केली जात नाही, अज्ञानाने झालेले नाही, जाणीवपूर्वक केली जात आहेत. जुना इतिहास पुसून काढायचा, महाराष्ट्राचा वेगळा इतिहास रचायचा हे कारस्थान आहे. नवा इतिहास आपल्यापासून सुरू झाला पाहिजे असे काही लोकांना वाटते त्यासाठीच खरा इतिहास पुसून नवा इतिहास मांडण्याचे कारस्थान सुरू केले आहे असाही आरोप जयंत पाटील यांनी केला. महापुरुषांची अस्मिता कशी भंग होईल... कमी कशी होईल यासाठी प्रयत्न होत आहे. भाजपचे लोक त्यात अग्रणी आहेत. लोकांच्या मनात तीव्र राग आहे. लोकं भाजपच्या लोकांना रस्त्यावर फिरणे मुश्कील करतील. राज्यपाल महाराष्ट्राच्या विरोधात वागतात, त्यांच्या एकाही कृतीवर केंद्रसरकारने भूमिका घेतली नाही. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातही महाराष्ट्रद्रोही लोक आहेत असाही आरोप जयंत पाटील यांनी केले. गुजरातमध्ये निवडणुका होत्या म्हणून वेदांता फॉक्सकॉन, टाटा एअरबससारखे प्रकल्प गुजरातला गेले. महाराष्ट्रातील तरुणांची संधी हिसकावून घेतली गेली. यावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री काहीच बोलत नाही. उलट तिकडे आलेल्या नवीन सरकाराच्या शपथविधीला उपस्थित राहतात. हे दुर्दैवी आहे असे स्पष्ट मत व्यक्त करतानाच कर्नाटकचे मुख्यमंत्री आपल्या राज्याबद्दल काहीही बोलतात त्याबाबतही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री काही बोलत नाही. त्यांनी स्वाभिमान गहाण ठेवला आहे असा टोलाही जयंत पाटील यांनी लगावला. महाविकास आघाडी सरकार असताना म्हैसाळ योजनेमार्फत जत तालुक्यातील ६५ गावांना पाणी देण्याची संपूर्ण व्यवस्था आम्ही केली होती. या भागांना ६ टीएमसी अतिरिक्त पाणी मिळणार आहे. त्याची डिझाइनिंग पूर्णतः तयार आहे. हा विषय फक्त मंत्रिमंडळासमोर येऊन त्याला मंत्रिमंडळाच्या मान्यतेची गरज आहे. मात्र हे सरकार फक्त आमदार सांभाळण्यात व्यस्त आहे. आज सीमा भागातील अनेक गावे या सरकारच्या नाकर्तेपणामुळे इतर राज्यात जाण्याची मागणी करत आहे. हे दुदैवी आहे असेही जयंत पाटील म्हणाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री केंद्राला शरण गेले आहेत का ? कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणतात ते माझे ट्विट नव्हे. हे किती धादांत खोटे आहे. हा खोटेपणा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री निमूटपणे सहन करत आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांच्या दारात गेल्यानंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणतात ते ट्विट त्यांचे नाही. ट्विट त्यांचे नसेल तर मग ते अद्याप डिलीट कसे झाले नाही ? ज्या दिवशी ट्विट आले त्यादिवशी त्यांनी स्पष्टीकरण द्यायला हवे होते. हा जाब आमच्या मुख्यमंत्र्यांनी विचारला नाही त्यामुळे आमचे मुख्यमंत्री त्यांना शरण गेले आहेत का ? असा सवालही जयंत पाटील यांनी उपस्थित केला.

# नवा भिडू नवे राज्य

आधुनिक केसरी

हिमाचल प्रदेशात सत्तांतर झाली असून काँग्रेसचे सरकार स्थापन झाले आहे. दरम्यान, काँग्रेसची सत्ता येताच अटल बोगद्याचे नामकरण होणार असल्याची चर्चा रंगली आहे. मात्र हिमालच प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. आमचे सरकार रोहतांग खिंडीतून बांधण्यात आलेल्या अटल बोगद्याचे नामकरण करणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र यावेळी त्यांनी फलकावरील नावांमध्ये बदल होणार असल्याचे स्पष्ट केले. फलकावरील नाव बदलले जाईल आणि ज्यांनी पायाभरणी केली त्यांचा समावेश असेल असे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी म्हटले आहे. दरम्यान माजी पंतप्रधानांबद्दल आदर असल्याने अटलबिहारी वाजपेयी यांचे दिलेले नाव बदलले जाणार नसल्याचे सुखविंदर सिंग सुखू यांनी सांगितल्याचे एएनआयने म्हटले आहे. बोगद्याचे नाव आम्ही बदलणार नाही. अटल बोगद्याचे नामांतर होणार नाही. आम्ही माजी पंतप्रधानांचा आदर करतो. पण भाजपाने ज्यांनी पायाभरणी केली होती, त्यांचाही आदर करायला हवा होता," असे नवनियुक्त मुख्यमंत्री म्हणाले आहेत. नव्याने निवडून आलेल्या काँग्रेस सरकारने अटलबिहारी वाजपेयींच्या समर्थनार्थ लावण्यात आलेला फलक काढल्यास आम्ही रस्त्यावर उतरु असा इशारा भाजपाने दिला आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका मांडत हे विधान केले आहे. राज्यातील भाजपा प्रवक्ते रणधीर शर्मा यांनी म्हटले होते की "सोनिया गांधी यांनी फक्त भुमीपूजन केले होते. पण सर्व काम वाजपेयी आणि केंद्र सरकारने केले आहे". मुख्यमंत्री सुखू यांनी फलकावर सोनिया गांधी, दिवंगत माजी मुख्यमंत्री वीरभद्र सिंग, माजी केंद्रीय मंत्री प्रेमकुमार धुमाळ आणि तत्कालीन संरक्षण मंत्री ए. के. अँटोनी यांच्या नावांचा समावेश करत नव्याने लावणार असल्याचं याआधी म्हटले होते. २०१० मध्ये सोनिया गांधींच्या हस्ते या बोगद्याचे भुमीपूजन करण्यात आले होते. ऑक्टोबर २०२० मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोगद्याचं उद्घाटन केले. हा बोगदा ९.०२ कि.मी.चा असून तो मनाली ते लाहौल-स्पिती या भागांना जोडतो. पीर पांजाल पर्वतराजीत ३ हजार मीटर म्हणजे १० हजार फूट उंचीवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने त्याची बांधणी केली आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# वाढते ॲसिड हल्ले चिंताजनक

आधुनिक केसरी

**दिल्लीमध्ये नुकत्याच झालेल्या ॲसिड हल्ल्याच्या घटनांमुळे मन हेलावले आहे. दिल्लीतील तिरंगा चौकात तरुणीवर ॲसिड फेकल्याची घटना समोर आली आहे. ती एका खासगी शाळेत बारावीत शिकते. घटनेच्या वेळी ती तिच्या लहान बहिणीसोबत होती. कुठे विनयभंग तर कुठे परस्पर वादातून ॲसिड हल्ला होत आहे. नागपूर जिलह्यातील सावनेर तालुक्यात महिला डॉक्टरवर ॲसिड हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती.या हल्ल्यात महिला डॉक्टरसह तिघे जखमी झाले.**

नुकतेच अररिया येथील काही तरुणांनी एका मुलीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकून जखमी केले. त्याआधी वैशाली येथे परस्पर वादातून १४ जणांवर ॲसिड हल्ला करण्यात आला होता. या वर्षी एप्रिलमध्ये भागलपूरमध्ये एका मुलीवर बदमाशांनी ॲसिड टाकले होते. नंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

इतके नियम आणि कायदे करूनही ॲसिड फेकण्याच्या घटना थांबत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. साधारणपणे मुलींवर ॲसिड हल्ला करून त्यांचा चेहरा खराब करण्याच्या उद्देशाने केला जातो. ती मुलगी माझी नाही तर ती दुस-या कोणाचीही नसावी, ही मानसिकता यामागे कार्यरत आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मते, दुःखी लोक इतरांना दुःखात पाहून समाधानी असतात. त्यांच्यात संयम नसतो, यालाच 'डिले ऑफ ग्रॅटिफिकेशन' म्हणतात. त्यांना एकाच वेळी सर्व काही हवे असते आणि ते मिळाले नाही तर ते हिंसाचार करायला मागेपुढे पाहत नाहीत. त्यांना हिंसेतूनच समाधान मिळते. हिंसाचार केल्यास लोक त्यांना घाबरतील असे त्यांना वाटते. ते भावनिकदृष्ट्या खूप कमकुवत आहेत. ज्या देशांमध्ये स्त्री-पुरुष समानता आहे, तेथे अशा घटना नगण्य आहेत. दुर्दैवाने भारतीय समाजात आजही पितृसत्ताक व्यवस्था प्रचलित आहे. या अंतर्गत पुरुषाचे श्रेष्ठत्व कायम आहे. स्त्री त्याच्यापेक्षा कनिष्ठ आहे आणि पुरुषाचा तिच्यावर नैसर्गिक अधिकार आहे, हे पुरुषाच्या नकळत मनात रुजलेलं असतं. जर एखाद्या स्त्रीला पुरुष आवडत नसेल तर ती हलके घेण्याऐवजी ती तिच्या पुरुषत्वाचा अपमान मानते. त्याला आपला पराभव मानून त्याचा राग येतो. अशा परिस्थितीत काही पुरुष वैतागून काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक ॲसिड हल्ल्यासारखे अमानुष पाऊल उचलतात. चिंतेची बाब म्हणजे सामाजिक बदल होऊनही ही समस्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे. तर याबाबत कायदे अधिक कडक करण्यात आले आहेत. याबाबत जनजागृतीचेही प्रयत्न झाले, तरीही ॲसिड हल्ले कमी होत नाहीत. ॲसिड हल्ल्याच्या बाबतीत, आधी आयपीसीमध्ये कोणतीही वेगळी तरतूद नव्हती आणि केवळ आयपीसीच्या कलम-३२६ (ज्यामुळे गंभीर दुखापत) गुन्हा नोंदवला गेला होता. दोषी आढळल्यास १० वर्षांपर्यंत कारावास किंवा जन्मठेपेची तरतूद होती, मात्र न्यायमूर्ती जे. एस वर्मा आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन, २०१३ मध्ये सरकारने आयपीसीमध्ये नवीन कायदेशीर तरतुदी केल्या आणि त्याअंतर्गत आयपीसीची कलम ३२६-ए आणि ३२६-बी अस्तित्वात आली. आयपीसीच्या कलम-३२६अ अन्वये अशी तरतूद करण्यात आली आहे की, जर एखाद्या व्यक्तीने दुसऱ्यावर ॲसिड हल्ला केला आणि त्यामुळे त्या व्यक्तीच्या शरीराचा भाग खराब झाला किंवा शरीरावर जखम झाली किंवा भाजली किंवा जळजळीत झाली, तर अशी व्यक्ती आढळल्यास दोषी असल्यास, त्याला किमान १० वर्षे कारावास आणि जास्तीत जास्त जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. एखाद्या व्यक्तीने इजा करण्याच्या किंवा हानी पोहोचवण्याच्या उद्देशाने दुसऱ्यावर ॲसिड फेकण्याचा प्रयत्न केला तर त्याच्याविरुद्ध आयपीसीच्या कलम-३२६ बी अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल. या प्रकरणात दोषी आढळल्यास किमान ५ वर्षे आणि कमाल ७ वर्षांची शिक्षा होऊ शकते. ॲसिड हल्ले रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना ॲसिड विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा करण्यास सांगितले आहे. हल्ल्यातील पीडितेच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी 3 लाख रुपयांची भरपाई देण्याचीही तरतूद आहे. अनेक राज्यांमध्ये ॲसिड हल्ला आणि संबंधित घटनांना आळा घालण्यासाठी, राज्य सरकारने ॲसिड ठेवण्याच्या आणि विक्रीच्या प्रक्रियेवर बारीक लक्ष ठेवण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या डीएमना जारी केल्या आहेत. यासोबतच ॲसिड खरेदी करणाऱ्यांची नावे आणि पत्ते रेकॉर्डमध्ये टाकणे आवश्यक आहे. त्या अहवालात एखाद्या व्यक्तीने किती प्रमाणात ॲसिड विकत घेतले आहे, याचीही माहिती देणे बंधनकारक आहे. दर महिन्याच्या ७ तारखेला एसडीएम ॲसिड विक्रेत्यांची चौकशी करून त्यांचा अहवाल राज्याच्या गृहमंत्रालयाला सादर करतील, असा निर्णय घेण्यात आला आहे. एसडीएमच्या तपासादरम्यान कोणाचा अहवाल चुकीचा आढळल्यास विक्रेत्याचा साठा सील करण्यात येईल. तसेच त्याला ५०,०००दंडही भरावा लागेल. बिहारमध्येही अशी व्यवस्था नक्कीच असेल. त्यानंतरही ॲसिड हल्ले सुरूच असतील, तर ते प्रशासनाचे दुर्लक्ष नक्कीच आहे.





डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# साहित्यातील नवा वाद

आधुनिक केसरी

**वादा शिवाय कुठलेही साहित्य संमेलन होऊ द्यायचेच नाही असा नियम आहे की काय, माहिती नाही. आता तर संमेलन सुरू व्हायला बराच अवधी असताना नव्या वादाला निमित्त मिळाले आहे. तेही सरकारनेच या वादाला वात लावण्याचे काम केले आहे. अनघा लेले यांनी केलेल्या श्री गांधी यांच्या अनुवादित पुस्तकाला दिलेला राज्य पुरस्कार रद्द करून,ते पुरस्कार देणाऱ्या समितीला बरखास्त करून,सरकारने स्वतःचे नवे मानदंड निर्माण केल्याचे दिसते.हा निर्णय घेणाऱ्या मंत्री,अधिकारी मंडळींनी मूळ पुस्तकं वाचले की नाही कोण जाणे. बहुधा नसावे.**

कारण ही निर्णय घेणारी मंडळी मुळातच इतकी विद्वान असतात की त्यांना साहित्य वाचनाची गरज भासत नसावी.जसे चित्रपट नबघता त्याला विरोध होतो. इतिहास न अभ्यासता त्याही क्षेत्रात दिवे पाजळलेजातात.तसेच हे प्रकरण असावे. कारण जर पुस्तकात, किंवा अनुवादात काहीआक्षेपार्ह असते तर यापूर्वीच आक्षेप का घेतलेनाहीत?साहित्यात कोणत्या गोष्टीवर आक्षेप घ्यायचा,कशावर बंदी आणायची याला काहीनियम आहेत का?साहित्यात समाजाचे प्रतिबिंब असतेअसे समजतात. समाजात सुष्ट दुष्ट दोन्ही प्रवृत्ती असतात. नीती बरोबर अनीतीअसते.भ्रष्टाचार असतो. क्रौर्य असते.या सगळ्या भावना साहित्यात विविध माध्यमातून चित्रित होणे अपेक्षित असते. ज्या पुस्तकावर आक्षेप घेतल्याजातोय त्याततुरुंगातील मुळ लेखकाच्या आठवणीआहेत. अनुभव कथन आहे, असे अनुभव कथन यापूर्वी अनेकांनी केले आहे. कुठल्याही विचारप्रवाहाशी व्यक्तीची बांधिलकी असू शकते. जोपर्यंत तुमच्या कलाविष्कारांनी समाजाचे नुकसान होत नाही, समाजात तेढ माजत नाही,असंतोष पसरविल्या जात नाही, तोपर्यंत कलाकृतीला आक्षेप घेण्याचे काही कारण असू नये.




इथे तर सरकारने नेमलेल्या समितीनेच पुरस्काराची निवड,घोषणा केली आहे. म्हणजे सरकार स्वतः आमची चूक झाली, आमचा निर्णय चुकला हे कबूल करते आहे.सध्याचे अनेक मंत्री, अन् मुख्यमंत्री हे आधीच्या सरकारचा भाग होते हे विशेष!यावरून मंत्र्याच्या सामूहिक निर्णय क्षमतेवर,जबाबदारीवर आक्षेप घेता येतो. आता अनेक जण पुरस्कार वापसी करणार, समिती चे राजीनामे देणार.. हेही नाटक नेहमीचे. समितीच्या अध्यक्षांनीराजीनामा दिलेला नाही हे विशेष. म्हणजे समितीतच मतभेद आहेत.मग त्यांच्या आधी घेतलेल्या निर्णयावर विश्वास कसा ठेवायचा ही प्रश्न उरतोच. एकूणच हे पुरस्कार कसे दिले जातात, समिती सदस्यांच्या नेमणुका कोणत्या निकषावर होतात, अंतिम निर्णय कसे, कोणत्या निकषांवर घेतले जातात हेही आता तपासण्याची गरज आहे. पूर्वी जी नावे पुरस्कारासाठी घोषित व्हायची ती साहित्य वर्तुळात माहितीची, गाजलेली असायची. सहसा पुरस्काराबद्दल वाद होत नसत. पुरस्कार चर्चेचा विषय नसत. आता तसे नाही. पुरस्काराच्या देखील कहाण्या चर्चिल्या जातात! आता येत्या साहित्य संमेलनात या विषयावर काय भूमिका घेतली जाते हे बघावे लागेल. कारण लाखो (आता करोडो) रुपये खर्चून साजरा होणाऱ्या या सोहळ्याने नेमके आतापर्यंत काय साध्य झाले, काय साध्य होते हा संशोधनाचा विषय. तेच ते कवी, तेच ते रटाळ परिसंवाद, ज्याचे पुढे काही होत नाही ते ठराव, अन् ठराविक राजकारणी पुढाऱ्यांचे वर्चस्व, हे अन् असेच चालते संमेलनात. ढासळत चाललेली वाचन संस्कृती, बंद होत चाललेली, झालेली दर्जेदार मासिके, जी मासिके उरली आहेत त्यांची ढासळलेली प्रकृती, पुस्तकं प्रकाशन व्यवसायाला आलेली मरगळ, विशिष्ट प्रकाशकांची मात्र चंगळ, लेखक, प्रकाशक, संपादक यांच्यातील झाकली मूठ स्वरूपाचे आर्थिक व्यवहार, लेखन स्वातंत्र्य, या व अशा विषयावर मात्र कुणाला चर्चा करावीशी वाटत नाही. आजकाल काही लिट फेस्टचे आयोजन केले जाते.त्यात मात्र विविध विषयावर चर्चा, प्रश्नोत्तरे, संवाद होतात. ज्यांचा दर्जा चांगला असतो. आपल्याकडे सुध्दा साहित्य संमेलनाचे स्वरूप बदलायला हवे. त्यात विद्यार्थ्यांचा, भाषा संशोधकाचा, वाचकाचा सक्रिय सहभाग हवा. सरकारचे अनुदान मिळाले तरी ते त्यांचे कर्तव्यच असते असे समजून, त्याच्या सहभागावर, राजकीय लाभ घेण्यावर अंकुश हवा.त्यांनीच संमेलन हायज्याक करणे चुकीचे. त्या ऐवजी तरुण विद्यार्थ्यांचा, समिक्षकाचा, प्रकाशक, वाचकाचा सक्रिय सहभाग वाढायला हवा.लेखन स्वातंत्र्य, एकूणच अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवेच कलाकाराला. त्यात तडजोड नको. कुठल्याही साहित्य कृतीला विरोध करण्याआधी त्यावर साधक बाधक चर्चा हवी. साहित्यात राजकारण नको.येत्या साहित्य संमेलनात या दृष्टीने काही पावले उचलली जातील, अध्यक्ष न्यायमूर्ती असल्याने न्याय करतील अशी आशा करू या.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# किशोरवयातील धोके



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**असं म्हटलं जातं की, माणसाचे भविष्य बालपण आणि या दरम्यान आत्मसात केल्या गेलेल्या मूल्यांवर अवलंबून असते.2011 च्या जणगणनेनुसार देशात जवळपास 41 टक्के लोकसंख्या ही 20 वर्षे वयापेक्षा कमी आहे. मुलांच्या तीन अवस्था मानल्या जातात.एक म्हणजे पाच वर्षे वयापर्यंत चालणारी शैशावस्था. दुसरी पाच ते बारा वर्षांपर्यंतची बाल्यावस्था आणि बारा ते वीस पर्यंतची किशोरावस्था. या आवस्था त्या त्या देशातल्या प्रकृती,संस्कृतीनुसार थोड्या फार भिन्न असतात. आपल्याकडे अल्पवयीन वय हे मुलींसाठी आठरा वर्षे आणि मुलांसाठी 21 वर्षे निश्चित करण्यात आले आहे. आपल्या सगळ्यांनाच माहित आहे, किशोरावस्था प्रत्येकासाठी विविध बदल घेऊन येतो. खासकरून या वयात मुलींमध्ये होणारे बदल महत्त्वपूर्ण असतात आणि त्याचे महत्त्वही तितकेच आहे.**

या काळात त्यांच्यात होणाऱ्या सगळ्या परिवर्तनाची माहिती घरातल्या मोठ्यांना खासकरून आईला द्यावी लागते. मुलींनी ती द्यायलाच हवी. दुसऱ्यांकडून मिळालेली चुकीची माहिती किशोर मुलींसाठी नुकसानकारक ठरू शकते. या काळात जबरदस्त मानसिक आणि शारीरिक बदल होत असतात.मुलींना आता आपल्याला लहान मुलगी समजू नये, असे वाटत असते. त्यांच्याशी मोठ्यांबरोबरच आणि सन्मानपूर्वक वागले पाहिजे असेही त्यांना वाटत असते.या काळात त्यांच्यात एकप्रकारची जिद्द येते. काही गोष्टींसाठी मुली अडून बसतात. नवनवीन स्वप्नांचा उदय त्यांच्या अंतरंगात होत असतो. या काळात नवनवीन गोष्टी त्यांच्यात जाणवत असतात. दुसऱ्यांना दाखवण्यासाठी आणि नटायचे, सजायचे ही इच्छादेखील वाढत असते. आणि मोठ्यांप्रमाणे आपणही आपापले निर्णय घ्यावेत, असे वाटत असते. त्यामुळे एकाद्या गोष्टीत उलटून बोलण्यासारखे वागणे, समजून घ्यायला हवे.हा या अवस्थेचाच परिणाम असतो. या कालावधीत आईने तिच्याशी मैत्रिणीप्रमाणे वागले पाहिजे.तिच्यातला बदल समजून घेतला पाहिजे. या वयात सर्वात मोठा बदल म्हणजे त्यांच्या मनात विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीविषयी आकर्षण वाढायला लागते. संपर्क व्हायला लागल्यावर ते एकमेकांना स्वाभाविकपणे जाणून-समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

या वयात मुलांचे विश्व वाढत, विस्तारत जाते. शाळेला जाता-येता नवनवीन सहकारी भेटत जातात, त्यांच्याशी संपर्क येत राहतो. या कालावधीत काही जणांच्या वागण्या, बोलण्यावर मुले प्रभावित होतात. यात शिक्षकांचाही समावेश असतो. अशा वेळेला आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची ठरते. यावेळेला काही दिवसांपूर्वी दिल्लीतल्या सटे गुरुग्रामच्या रेयान स्कूलमध्ये घडलेल्या एका मुलाच्या खुनाची आठवण केली जाऊ शकते. ही घटना पालकांना सावध करते, ती यासाठी की, त्यांनी आपल्या मुलांविषयी गंभीर व्हायला हवे. बाहेरच्या कुठल्याही अडचणींच्या विषयांवर मुलांशी अगदी खुल्या मनाने बोला. मग या गोष्टी केव्हा घडतात, ज्यावेळेला पालक आपल्या मुलावर विश्वास ठेवतात तेव्हा! एकादेवेळेस त्याने चूक केली असल्यास ती माफ करावी आणि पुढच्या प्रसंगांवर पडदा टाकण्यासाठी स्वतः पुढाकार घ्यायला हवा.

अशा परिस्थितीत सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्यूरोनुसार बलात्काराच्या साठ टक्के घटनांमध्ये पिडित असलेल्या या लहान मुलीच आहेत.कदाचित अशाप्रकारच्या घटनांच्याबाबतीत आई-वडील मुलीला सावध करण्यात कमी पडल्या असाव्यात. आजची परिस्थिती फारच वेगळी असून आपल्या नातेवाईकांवरही भरवसा ठेवण्यासारखी परिस्थिती नाही. त्यामुळे तिच्याबाबतीत काही घडू शकते,याबाबत मुलींशी चर्चा करावी आणि त्या गोष्टींपासून सावध राहण्याचा सल्ला द्यायला हवा. अडचणीच्यावेळी मुलीला कसे वागावे,याचे प्रशिक्षण द्यायला हवे. सहसा मुलीला आईने एकटे-दुकटे सोडू नये,पाठवू नये. आवश्यक त्या ठिकाणी आई तिच्यासोबत असायला हवी. मुलीच्या वागण्या-बोलण्यातला फरक आईने जाणायला हवा. हा कालावधी आई-वडिलांसाठी मोठा परीक्षेचा असतो.जुनी माणसं सांगतात, मुलं ज्यावेळेला आपल्या खांद्याला येतात, त्यावेळेला त्यांच्याशी बाप नव्हे तर मित्रासारखे वागले पाहिजे.



आज मुलांचे विश्व नव्या तंत्रज्ञानानुसार बदलले आहे. त्यांच्या हातात मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटर यांबरोबरच अनेक प्रकारची गॅजेट्स येत आहेत.व्हिडिओ गेम, सोशल मिडिया त्यांच्या हातात असतो. अशा वेळेला मागचा-पुढचा विचार न करता काहीही करण्याची प्रबळ इच्छा उसळून येत असते. याचा फायदा बरेच लोक,कंपन्या घ्यायला टपलेल्या असतात. ब्लू व्हेल आणि अशासारखी अनेक हिंसक गेम्स मुलांना त्यात गुंतवण्यासाठी प्रोत्साहित करत असतात.दुसऱ्या बाजूला नोकरदार पालक त्यांच्या व्यस्त कामामुळे मुलांकडे लक्ष देऊ शकत नाहीत.त्यांना हवा तसा वेळ देऊ शकत नाहीत. असा वेळेला मुलेदेखील आपला आश्रय मोबाईल, कॉम्प्युटरमध्ये शोधतात. आणि नुकसानकारक खेळांमध्ये फसतात. यामुळे पालकांसमोर मोठे आव्हान आहे ते म्हणजे मुलांजवळ आवश्यक त्या काळात त्यांच्याकडे मोबाईलसारख्या असाव्यात पण त्याचा वापर आवश्यकतेपेक्षा जास्त वापर होऊ नये,याची काळजी घेणे. काही सर्व्हे सांगतात की, गरजेपेक्षा अधिक काळ मोबाईल आणि कॉम्प्युटरचा वापर करणारी मुले चिडचिडी होतात. वेळ तर वाया जातोच,हा भाग वेगळाच आहे.त्यामुळे त्यांच्या अभ्यासावर, बुद्धीवर परिणाम होतो.त्यामुळे त्यांना गोडीगुलाबीत या गोष्टींपासून दूर करण्याचे कसब पालकांनी शिकले पाहिजे.मुलांच्या एकटेपणाला पर्याय शोधताना इतर मुलांशी आपली मुले खेळली पाहिजेत, अशी व्यवस्था पालकांनी करायला हवी. मुले शरीराने सशक्त आणि आतून परोपकारी, समजूतदार ,कणखर व्हायला हवीत.त्यांच्या सामाजिक विकासावर भर द्यायला हवा.

मोबाईल, कॉम्प्युटर, इंटरनेट एकादृष्टीने तोट्याचे आहेत,तितकेच ते फायद्याचे आहेत. ज्ञान आणि माहिती देणाऱ्या वेबसाईट्स अगणीत आहेत. दहावी-बारावी, स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम त्यांमध्ये उपलब्ध आहेत.विज्ञान,गणितसारखे अवघड विषय सोपे करून सांगणाऱ्या अनेक वेबसाईटस आहेत. मुलांच्या डोक्यात ध्येय निश्चित करून त्याचा पाठपुरावा करायसाठी त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे. आई-वडील, शिक्षक यांनी मुलांचा कल त्याकडे कसा वाढेल,यादृष्टीने प्रयत्न करायला हवेत. आज शिक्षण महाग झाले आहे.मात्र मुलांसाठी कोचिंग क्लास, विविध प्रकाशनाची पुस्तके, नोट्स असं बरंच काही उपलब्ध आहे. पालकांनी आपापल्या परीने त्यांच्या ध्येयासाठी, अभ्यासासाठी आपला पैसा, वेळ खर्च करायला हवा. मुलांना अभ्यासाची गोडी वाढावी, तसे वातावरण त्याच्याभोवती तयार व्हायला हवे, त्यांना हवी ती पुस्तके,नोट्स उपलब्ध करून देण्यासाठी पालक म्हणून आपली जबाबदारी पार पाडायला हवी. मुले बिघडण्याचा काही कालावधी असतो. अर्थात मुले बिघडतात, म्हणजे पाहिजे त्यावेळेलेला पाहिजे ते संस्कार त्यांच्यावर झाले तर मुले आयुष्यात चांगला माणूस बनतात. चांगल्या कामावर, मेहनत,चिकाटी,जिद्द याच्यावर भरवसा ठेवतात. नाहीतर शॉर्टकटचा मार्ग पत्करून वा मार्गाला लागतात.यात मुलांचे नुकसानच आहे. कुठलीही वाईट गोष्ट शेवटपर्यंत जात नाही, असा संस्कार पालकांनी स्वतः आपल्यापासून करायला हवा.मुले घरातून आणि समजातूनच अधिक शिकतात. मित्रांच्या संगतीने मुले वाट्टेल ते करायला तयार होतात.मात्र घरचे संस्कार चांगले असतील तर मुले कितीही दबाव आला तरी त्याला बळी पडत नाही. मुले एकदा वाईट मार्गाला लागली तर लवकर त्यातून बाहेर पडत नाहीत.चैनी,मस्ती आणि पैसा यावर त्यांची अधिक भिस्त असते.त्यामुळे त्यांचे मन कुणाचेच काही ऐकत नाही.त्यामुळे ते बिघडण्यापूर्वीच त्यांना सावरले पाहिजे. इथे आई-वडिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

# सेक्सटॉर्शनपासून सावध राहणे गरजेचे



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**राज्यात सेक्सटॉर्शनच्या नावाखाली फसवणूक किंवा खंडणी गोळा करण्याचा प्रकार वाढला असून, यावर्षभरात संपूर्ण महाराष्ट्रात सेक्सटॉर्शनच्या सुमारे २२९ प्रकरणांची नोंद झाली आहे. तसेच २००२ लेखी तक्रारी पोलिसांच्या ऑनलाइन पोर्टलवर प्राप्त झाल्या आहेत. अशा फसवणुकीप्रकरणी पोलिसांनी एकूण१७२ जणांना अटक केली आहे. बहुतेक आरोपी हे परराज्यातील आहेत. सेक्सटॉर्शनच्या प्रकरणात वाढ होऊ लागल्याने महाराष्ट्र सायबर पोलिसांनी पीडित व्यक्तींना आता मदतीचा हात देण्याचे ठरवले आहे. त्यामुळे सेक्सटॉर्शन खंडणीचा फोन आल्यास घाबरून जाऊ नये, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे. तसेच पोलिस सेक्सटॉर्शन पीडितांचे समुपदेशनही करणार आहेत.**

सेक्सटॉर्शनच्या या प्रकाराला तरुणच नाही तर वयस्कर व्यक्तीही सध्या बळी पडत आहेत. लैंगिक आकर्षणामुळे सेक्सटॉर्शनसारख्या गुन्ह्यात अडकणाऱ्या तरुणांची संख्या ही सगळ्यात जास्त असून यात १९ ते २७ वयोगटातील तरुणांचे प्रमाण अधिक आहे. कामाचा ताण, एकटेपणा आणि सोशल मीडियावरून होणारी घुसमट यातून मार्ग काढण्यासाठी अनेक तरुण अशा प्रकारच्या जाळ्यात आपसूक ओढले जातात. तसेच, लैंगिक आकर्षणामुळे मुलींसोबत सेक्स चॅट करतात. अशा तरुणांना सायबर गुन्हेगार हेरून त्यांना सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात ओढतात. त्यानंतर त्यांना ब्लॅकमेल करून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळत असल्याचे अनेक गुन्ह्यांत आढळून आले आहे. सेक्सटॉर्शनला बळी पडलेले अनेक जण बदनामीच्या भीतीने पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी जात नसल्यामुळे सेक्सटॉर्शनचे गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण कमी असल्याचेही आढळून आले आहे. सेक्सटॉर्शनच्या प्रकारात सायबर गुन्हेगार बनावट प्रोफाइल तयार करतात. समाजमाध्यमांवर अनोळखी महिला 'हाय, हॅलो' मैत्रीची सुरुवात करते. संदेशाला प्रतिसाद मिळाल्यास मोबाइल क्रमांकाची मागणी केली जाते. आधी अश्लील संभाषण आणि नंतर अर्धनग्न अवस्थेत व्हिडीओ कॉल केला जातो. समोरच्या व्यक्तीलाही असे करण्यास प्रवृत्त केले जाते. हा व्हिडिओ कॉल रेकॉर्ड केला जातो. हा रेकॉर्ड झालेला व्हिडिओ कॉल व्हायरल करण्याची धमकी देऊन पीडितांना धमकावून पैसे उकळले जातात. काहीजण इभ्रतीचा प्रश्न म्हणून खंडणीची रक्कम देतात, तर काही जणांकडून खंडणी मागणारा फोन क्रमांक ब्लॉक केला जातो. सायबरचोरांनी काही दिवसांपूर्वीच एका ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला अज्ञात महिलेच्या माध्यमातून व्हिडीओ कॉल करून अश्लील चॅट केले होते. तसेच, रेकॉर्डिंग केलेला व्हिडीओ पाठवून हे अश्लील व्हिडीओ कॉल रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी दिली. यासाठी त्याच्याकडून एकूण १ लाख २७ हजार रुपये उकळले होते. सेक्सटॉर्शनच्या नावाखाली मागण्यात येणाऱ्या खंडणीमुळे अनेकजण उद्ध्वस्त होत आहेत. बऱ्याचदा सेक्सटॉर्शनची धमकी गांभीर्याने घेणाऱ्या व्यक्तींच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. अशा व्यक्ती सातत्याने तणावाखाली असतात. सार्वजनिक कार्यक्रमांना उपस्थित राहणे टाळतात आणि एकलकोंडे होतात. यातून काहीजण आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलतात. दोन महिन्यांपूर्वी पुण्यातील एका बातमीने खळबळ उडाली होती. शहरातील दोन तरुणांना त्यांचे नग्न छायाचित्र आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली. त्याला घाबरून या दोन्ही तरुणांनी आत्महत्या केली होती. या दोन तरुणांना सातत्याने धमकावले जात होते. त्यांच्याकडून पैसे उकळले जात होते. बदनामीच्या भीतीने त्यांना ब्लॅकमेलिंग होत राहिले, मात्र वसुलीची मागणी पूर्ण करणे कठीण झाल्याने अखेर दोन्ही तरुणांनी टोकाचं पाऊल उचलत जीवन संपवलं. प्रत्येकाला आपले वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक आयुष्य नीट सांभाळता आले पाहिजे. मात्र सध्याच्या पिढीला हे सांभाळता येत नाही. अनेकांचा 'स्क्रीन टाइम' हा १६ तासांपेक्षा जास्त असतो. त्यामुळे कुटुंबात आणि मित्र परिवारात गप्पा होत नाहीत. संवादाचा अभाव असल्याने एखादी अशा प्रकारची घटना घडली, आणि ती कोणाला सांगितली तर त्यावर कोण कशी प्रतिक्रिया देईल, याची भीती असते. त्यामुळे संवाद वाढवला तरच अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यातून अथवा इतर गुन्ह्यांच्या माध्यमातून जाणारा जीव वाचू शकेल. त्याचप्रमाणे काळानुसार शाळेमध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे तसेच मोबाइल कसा हाताळायचा, याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. त्यामुळे वयात येताना या मुलांना गुन्ह्यांची माहिती मिळेल आणि मुले अत्यंत हुशारीने मोबाइल वापरतील. सेक्सटॉर्शनच्या या वाढत्या प्रकाराला आळा घालण्यासाठी आता थेट सायबर विभागाचे पोलिस सरसावले आहेत. त्यामुळे आता सेक्सटॉर्शन पीडितांना घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. तरुण-तरुणींनी व नागरिकांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरताना तसेच सोशल मीडिया हाताळताना दक्षता घेऊन तसेच ऑनलाइन ऍप्लिकेशन्स वापराचे पूर्णपणे ज्ञान आत्मसात करूनच त्याचा वापर करावा. ऑनलाइन असताना संभाव्य धोका समजून घ्या आणि सुरक्षित राहा. समाजमाध्यमांवर अनोळखी व्यक्तीसोबत मैत्री करताना सावधगिरी बाळगा. अनोळखी व्यक्तींसोबत कधीही वैयक्तिक माहिती शेअर करू नका. तुमचे खासगी फोटो कुणालाही शेअर करू नका. अनोळखी व्यक्तीने केलेले 'व्हिडीओ कॉल' स्वीकारू नका. एखादा 'न्यूड कॉल' चुकून स्वीकारला गेला तर अधिक काळ बोलू नका. बदनामीची भीती दाखवून पैशाची मागणी केल्यास आर्थिक व्यवहार करू नका. सेक्सटॉर्शनच्या खंडणीला बळी पडल्यास तात्काळ योग्य ती खबरदारी घ्यावी. त्यात पीडितांनी घाबरून जाऊ नये आणि फसवणूक करणा-यांशी त्वरित संवाद थांबवावा. ब्लॅकमेल आणि धमक्यांचे पुरावे जतन करा. एवढेच नव्हे, तर सेक्सटॉर्शनला बळी पडले असल्याची बाब जवळच्या पोलिस ठाण्यात तात्काळ कळवावी. सेक्सटॉर्शनसारख्या प्रकरणाला धैर्याने सामोरे जा, घाबरू नका. कुटुंब आणि मित्रांना घटनेची माहिती द्या आणि त्यांना विश्वासात घ्या, जागरुक करा, असा सल्ला देण्यात आला आहे.



# कायद्याला प्रबोधनाची जोड द्या



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**सिंगल सिगारेट विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे वर्तमानपत्रात वाचले. सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. अर्थात सिंगल सिगारेटवर बंदी घालण्याचा निर्णय योग्य असला तरी हा निर्णय म्हणजे आजारापेक्षा उपाय भयंकर असाच ठरण्याची शक्यता अधिक आहे कारण सिंगल सिगारेटवर बंदी घातल्यामुळे धूम्रपान करणारे लोक आता सिगारेटचे पूर्ण पाकीटच विकत घेतील त्यामुळे सिगारेट पिण्याचे प्रमाण आखणी वाढेल.**



अर्थात धूम्रपान विरोधात हा पहिला कायदा नाही. धूम्रपान विरोधात आपल्या देशात अनेक कायदे आहेत मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही काही वर्षांपूर्वी सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी घातली होती मात्र ही बंदी कागदावरच राहिली आजही सार्वजनिक ठिकाणी सर्रास धूम्रपान केले जाते. धूम्रपानाचे दुष्परिणाम माहीत असूनही लोक धूम्रपान करतात आणि स्वतःसह इतरांचे आरोग्यही धोक्यात घालतात. सरकारही अशा कायद्याची मलमपट्टी करून वेळ मारून नेते. वास्तविक सरकारनेही सिंगल सिगारेट विक्रीवर बंदी, सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी असे कायदे करण्यापेक्षा सरकारने सरळ सिगारेट, विडी, गुटखा या सारख्या तंबाखूजन्य वस्तूंच्या निर्मितीवरच बंदी घालावी. जर सिगारेट बनलीच नाही तर पुढे ती विकण्याचा आणि धूम्रपान करण्याचा प्रश्नच येणार नाही. सरकारने इच्छाशक्ती दाखवत थेट मुळावरच घाव घालावा. सरकारने सिगारेट निर्मितीवरच बंदी घालावी मात्र सरकार सिगारेटवर बंदी घालणार नाही हे ही तितकेच खरे कारण सिगारेट निर्मितीतून सरकारला मोठा महसूल मिळतो. या महसुलावर सरकार पाणी पडू देणार नाही त्यामुळेच नागरिकांनीच सिगरेट, विडी, गुटखा तंबाखूपासून दूर राहायला हवे. तंबाखूचे अनेक दुष्परिणाम आहेत. विडी किंवा सिगारेट पिणाऱ्या माणसाच्या तोंडाला उग्र वास येतो. सतत सिगारेट, बिडी पिणाऱ्या तसेच तंबाखू खाणाऱ्या माणसांना कर्करोगाचा धोका असतो. सिगारेटच्या पाकिटावर देखील तसा इशारा लिहिलेला असतो पण धूम्रपान शौकिनांना त्याचे काहीही सोयर सुतक नसते. ते धूम्रपान करीतच असतात. अलीकडे धूम्रपान करणाऱ्यांची संख्या कमालीची वाढली आहे. विशेष म्हणजे यात तरुण तरुणींची संख्या लक्षणीय आहे. धूम्रपान संबंधी अनेक कायदे करूनही धूम्रपान करणाऱ्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. याचाच अर्थ केवळ कायदे करून उपयोग नाही तर त्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणीही व्हायला हवी. आता हेच पहा ना राम नाईक रेल्वेमंत्री असताना त्यांनी रेल्वे प्लॅटफॉर्मवर सिगारेट विक्रीस बंदीचा तसेच लोकल, गाड्यात धूम्रपान करण्यास बंदी घातली होती पण अलीकडे लोकल गाड्यात अनेक फेरीवाले सिगारेट विकताना दिसतात तसेच लोकल गाड्यात सिगारेट ओढणारे प्रवासीही आढळून येतात त्यामुळे कायद्यासोबतच प्रबोधनाचा मार्गही सरकारने अवलंबवायला हवा. धूम्रपानाचे दुष्परिणाम शाळा कॉलेजमधील मुलांना समजावून सांगावेत. सोशल मीडियावर त्यासंदर्भात जनजागृती करावी. चित्रपटातील धुम्रपानाच्या दृश्यावर बंदी घालावी. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच सरकारने प्रबोधनाचा मार्गही अवलंबला तर धूम्रपान करणाऱ्यांची संख्या निश्चितपणे घटेल.

# श्री नवनाथ माहिती

आधुनिक केसरी

**श्री दत्त जंयती निमित्ताने आपण श्रीदत्त अवतारी श्रीगुरू बद्दल माहिती घेत आहे सर्वात प्रथम संत श्री गजानन महाराज शेगांव निवासी यांची आणि श्रीदत्त स्वरूपी श्री साईबाबा यांची माहिती पाहिली आज आपण श्रीनवनाथ यांच्या बद्दल माहिती घेऊ श्रीनवनाथ नावे:- मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ, हे नऊ नाथ आहेत.**

आधुनिक केसरी



नाथ संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून प्रामुख्याने मत्स्येन्द्रनाथ (मच्छिन्द्रनाथ) आणि गोरक्षनाथ या गुरुशिष्यांचे नाव घ्यावे लागेल. या दोहोंचा जन्म, त्यांचे चमत्कारांनी भरलेले आयुष्य, त्यांनी केलेले कार्य या विषयांशी संबंधित अनेक कथाही जनमानसात प्रचलित आहेत. मत्स्येन्द्रनाथांनी त्यांच्या मासळी- आईच्या पोटात असतानाच शिव-पार्वती संवाद दैवयोगाने कानी पडल्यावर प्राप्त करून घेतलेले ज्ञान, गाईच्या शेणाच्या ढिगातून गोरक्षनाथांचा झालेला जन्म, मत्स्येन्द्रांना खाव्याशा वाटलेल्या वडयाकरिता गोरक्षनाथांनी आपला एक डोळा काढून देऊन दाखविलेली पराकोटीची गुरुभक्ती, मंत्रजप करताना हाती असलेल्या मातीच्या पुतळ्यामध्ये प्राणसंचार होऊन गोरक्षनाथांकडून गहिनीनाथांचा झालेला चमत्कृतीपूर्ण जन्म अशा त्यांच्या असंख्य कथा महाराष्ट्राच्या मातीत खोलवर रुजल्या आहेत. नवनाथांच्या परंपरेमध्येच आपल्याला चौऱ्याऐंशी सिद्धांचा उल्लेख सापडतो. ही ८४ सिद्धांची कल्पना मूलतः वज्रयान परंपरेतील आहे. संशोधकांचे असे मत आहे की, बौद्ध धर्माच्या ऱ्हासाच्या काळात गोरक्षनाथांच्या प्रभावाने अनेक बौद्धानुयायी ज्या वेळी नाथपंथात सामील झाले, त्या वेळी त्यांच्याकडील ८४ सिद्धांची ही संकल्पना नाथांकडे रूढ झाली असावी. या सिद्धांची देखील विस्तृत नामावली उपलब्ध असून त्यापैकी ८४ सिद्ध नेमके कोणते, याबद्दल मितभिन्नता आढळते. ढोबळमानाने असे म्हणता येईल की, नवनाथांचा संप्रदाय अनेकांनी स्वीकारून सिद्धपद प्राप्त केले. या सिद्धांकडून आणि त्यांच्या शिष्यांकडून विविध लोकांना सांप्रदायिक उपदेश मिळाला आणि यातून पुढे नाथ संप्रदायातील अनेक गुरु-शिष्य परंपरांचा जन्म झाला. यातील काही परंपरांमध्ये प्रामुख्याने मंत्र-तंत्रविषयक ज्ञान आहे. काही परंपरा तत्त्वज्ञानप्रधान असून त्यामध्ये योग आणि ध्यान या उपासना पद्धतींचा अवलंब केला जातो. महाराष्ट्रातील भक्तीमार्गातही नाथ परंपरा रुजली असून अनेक भक्त मंडळी गुरूपदिष्ट मार्गाने नामसंकीर्तन, गुरुपूजन इत्यादीद्वारे मोक्षप्राप्ती करून घेण्याची मनीषा बाळगतात.

**सांप्रदायिक सिद्धांत, आचार आणि महत्त्वाची स्थळे**

आपण यापूर्वी पाहिल्याप्रमाणे सिद्धमत अथवा अवधूतमत या नावानेही प्रसिद्ध असलेल्या नाथ संप्रदायामध्ये आदिनाथ शिवाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. काश्मीर शैव परंपरेतून आलेल्या सिद्धांताशी मिळतीजुळती मांडणी आपल्याला नाथ संप्रदायामध्ये पाहावयास मिळते. योगमार्गाचा अवलंब प्रधान असल्याने योगशास्त्रातील अनेक संकल्पनाही या संप्रदायात रूढ झाल्या आहेत. नाथांच्या सांप्रदायिक सिद्धांतांची माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे गुरू गोरक्षनाथ विरचित सिद्धसिद्धांत पद्धती. या संस्कृत भाषेतील ग्रंथाच्या प्रारंभीच ग्रंथकर्त्यांने शक्तीसह विद्यमान शिवास वंदन केले आहे-

***आदिनाथं नमस्कृत्य शक्तियुक्तं जगद्गुरुम्।***
***वक्ष्ये गोरक्षनाथोऽहं सिद्धसिद्धान्तपद्धतिम्।।***

या सिद्धांतामध्ये शक्ती जरी स्वतंत्र नसून शिवातच अंतर्भूत आहे. किंबहुना शिवातील इकार म्हणजेच शक्ती होय. असे असले तरी तिचे महत्त्व मात्र पुष्कळ आहे. कारण शिव या शक्तीमुळेच या ब्रह्माण्डाची उत्पत्ति-स्थिति-विलय नियन्त्रित करतो. शक्तिविना शिव म्हणजे शव होय. चंद्रचंद्रिकान्यायाने शिव आणि शक्ती एकमेकांपासून अभिन्न असतात. शक्ती व्यक्त स्वरूपात असताना शिव सृष्टीच्या निर्मिती, स्थिती अथवा लयाचे कार्य करतो. ती जेव्हा अव्यक्त असते, तेव्हा त्या दोहोंमध्ये मात्र कोणताही भेद दिसून येत नाही. म्हणजेच त्याचे स्वरूप एकमेव, अद्वय असे असते. मराठी भाषेतील पिण्डी ते ब्रह्माण्डी या न्यायासारखाच जे जे ब्रह्माण्डात (जगतात) आहे, ते ते सर्व पिण्डात (देहात) देखील आहे, असा सिद्धांत गुरू गोरक्षनाथ सांगतात. मानवी देहामध्ये कुंडलिनी या नावाने प्रसिद्ध असणारी ही शक्ती साडेतीन वेटोळी घालून अधोमुखी होऊन बसलेल्या नागिणीच्या रूपाने मेरुदण्डाच्या मुळाशी सुप्तावस्थेत विद्यमान असते. तिचे मस्तकातील सहस्रारचक्रात निवास करणाऱ्या शिवाशी मीलन व्हावे याकरिता गुरुकृपेची आणि साधनेची आवश्यकता असते. शरीरात लहान-मोठया अशा बहात्तर हजार नाडया आहेत. त्यापैकी श्वासोच्छ्वास मार्गाशी आणि मेरुदण्डाशी संबंधित तीन महत्त्वाच्या नाडया इडा, पिंगला आणि सुषुम्ना या होत. कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यानंतर यांतील सुषुम्नेमधून वर धाव घेते. ***क्रमशः***

# सर्कस भारतीयच; मात्र धुमधडाका परदेशात !



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या मातीतसुद्धा एक असा विदुषक होऊन गेला, जो सर्कशीत लोकांचे मनोरंजन करायचा. हा विदुषक कोणत्याही सिनेमातला नाही, तर खऱ्या आयुष्यातला होता. या विदुषकाची कीर्ती केवळ महाराष्ट्रभरच नाही तर संपूर्ण जगभर पसरली होती. या विदूषकाचे नाव बंडोपंत देवल उर्फ सर्कस सम्राट काशिनाथ सखाराम असे होते. त्यांच्या स्मृती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखातून उजाळा देण्याचा हा प्रयत्न...**

भारत देश जेव्हा ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता. तेव्हा युरोप देशातल्या अनेक सर्कस कंपन्या भारतात येऊन खेळ सादर करत. जसे दादासाहेब फाळके यांनी ब्रिटीश सिनेमे पाहून सिनेमा बनवण्याचा ध्यास घेतला. तसेच पाश्चात्य देशांची सर्कस कला बघून भारतीयांची सुध्दा एक सर्कस असावी, असा विचार एका मराठी माणसाने केला. त्यांचे नाव विष्णुपंत छत्रे होते. त्यांनी सन १८७८ साली सांगली येथे अस्सल भारतीय पद्धतीची छत्रे सर्कस निर्माण केली. विष्णुपंत स्वतः उत्कृष्ट घोडेस्वार होते. त्यामुळे तेथे ते घोड्यांच्या सहाय्याने खेळ करणे, निरनिराळे स्टंट करणे, अशा अनेक गोष्टी अगदी कुशलतेने करायचे. सन १८८४ साली त्यांनी अनेक युरोपीय सर्कसपटू आपल्या सर्कशीत घेतले. यानंतर त्यांनी ग्रँड इंडीयन सर्कस असे नाव सर्कशीला दिले आणि ही सर्कस घेऊन त्यांनी भारतभर तसेच परदेशात दौरे काढले. त्याकाळी विष्णुपंत छत्रे हा मराठी माणूस सर्कशीच्या माध्यमातून ब्रिटिशांना न जुमानता सर्वत्र प्रयोग करत होता. त्यांची सर्कस मोठी होत गेली. परंतु त्यांच्या सर्कशीमध्ये काम करणाऱ्या माणसांनी स्वतःची एक वेगळी सर्कस काढली. छत्रे सर्कशीत नाव मिळवलेले मिरज म्हैशाळचे बाबासाहेब देवल यांनी आपल्या भावांसोबत सन १८९५ साली स्वतःची नवी सर्कस काढली. मिरजेच्या जोकरमुळे भारतातली सर्कस परदेशी भूमीवर धुमाकूळ घालू लागली. विदूषक किंवा जोकरचे खूप आकर्षण जनमनात होते. हॉलिवूडचा दि डार्क नाईट मधला जोकर तर अजूनही मनातून कधीकधी डोकावतो. जेव्हा लक्ष्याचा एक होता विदुषक पाहण्यात आला, तेव्हा विदुषकाच्या मुखावट्यामागे हसऱ्या चेहऱ्या पलिकडे एक वेगळे आणि काहीसे वेगळे जीवन दडलेले आहे, याची जाणीव झाली. अलीकडेच जोकर हा सिनेमा रिलीज झाला, तेव्हा परिस्थितीने दिलेल्या अफाट दुःखातून माणसाचा जोकर कसा होतो, हे अनुभवायला मिळाले.



सर्कशीचा इतिहास तसा फार जुना आहे. प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीत सर्कस सर्वप्रथम सुरू झाली, असे मानतात. त्याकाळी सर्कशीचे प्रमुख आकर्षण म्हणजे घोड्यांवर बसून होणारे अनेक प्रकारचे खेळ आणि प्राण्यांचे सामने हे होय. त्यामुळे सर्कस पाहणे ही उपस्थित लोकांसाठी एक पर्वणीच असायची. हळूहळू सर्कशीचे स्वरूप बदलत गेले तरीही सर्कसमध्ये या प्रमुख गोष्टी हमखास असायच्या. पारंपरिक सर्कशीची परंपरा थोडी लोप पावून आधुनिक काळानुसार सर्कस बदलली. फिलिप ॲस्टली या परदेशी घोडेस्वाराने इ.स.१७४२ साली आधुनिक सर्कशीला सुरुवात केली. अशाप्रकारे सर्कस फोफावत गेली आणि सर्कस कलेचा जगभरात विस्तार होत गेला. मोठ्या मनाच्या विष्णुपंतांनी बाबासाहेबांना सांगितले की नवीन सर्कस काढतोयस तर आपल्या सर्कसचा जुना तंबू घेऊन जा. अशा तऱ्हेने छत्रे सर्कसचा जुना तंबू घेऊन नवीन देवल सर्कसची सुरुवात झाली. सर्कसच्या सुरुवातीला बाबसाहेबांबरोबर होते धाकटे तिन्ही बंधू आणि म्हैसाळमधील सवंगडी. खरंतर बाबासाहेब सोडले तर इतर सर्व लोकांना सर्कस मधील कोणतीच कला अवगत नव्हती. पण अवघ्या काही दिवसांतच या लोकांमधूनच विविध खेळ दाखवणाऱ्या कलाकारांचा संच बाबासाहेबांनी तयार करून दाखवला. देवल सर्कस या नावाने ही सर्कस त्यावेळी सर्वत्र प्रसिद्ध झाली. पुढे ग्रेट इंडियन सर्कस म्हणून या सर्कसची जगभरात ख्याती झाली. भव्य दिव्य तामझाम, चित्तथरारक खेळ, सफाईदार कसरती, अशी या सर्कशीची वैशिष्ट्य होती. या सर्कशीचे प्रमुख आकर्षण म्हणजे काशिनाथ सखाराम उर्फ बंडोपंत देवल होते. असे म्हणू शकतो, की बंडोपंत देवल एकट्याच्या जोरावर देवल सर्कस रंजक करायचे. याला कारण असे की त्यांनी रंगवलेला विदुषक होय. बंडोपंत असा फर्मास विदुषक उभा करायचे, की त्यांचा विदुषक पाहायला देवल सर्कसमध्ये गर्दी व्हायची. वयाच्या ११व्या वर्षापासून बंडोपंत सर्कशीत काम करत होते. त्यांचे काका बाबासाहेब देवल यांच्यापासून त्यांना या कलेतल्या अनेक छोट्या छोट्या गोष्टी कळून आल्या होत्या. बंडोपंतांनी सिंगापूर, अफगाणिस्तान, मद्रास, मैसूर येथे धूम माजवली होती. ज्याकाळात भारतातल्या इतर सर्कसी बैलगाडीतून प्रवास करायच्या त्याकाळी देवल सर्कस परदेशी भूमीवर धुमाकूळ घालत होती.

बंडोपंत देवल यांच्या विदूषकाचे नाव सर्वदूर पसरले होते. एकदा मिरजेला स्वातंत्र्यवीर सावरकर खास बंडोपंतांना भेटण्यासाठी आले होते. तो काळ मराठी संगीत नाटके आणि सर्कशींसाठी एक सुवर्णकाळ होता. मराठी संगीत नाटकांच्या जशा अनेक कंपन्या होत्या. तसेच सर्कस कलेमध्ये सुद्धा अनेक कंपन्या असून त्या लोकांचे मनोरंजन करत असत. दुसऱ्या महायुद्धाची मोठी झळ सर्कस कंपन्यांना बसली. यामध्ये देवल सर्कसलासुद्धा उतरती कळा लागली. पुढे महात्मा गांधींच्या हत्येनंतर जाळपोळ आणि सगळीकडे लुटालूट सुरू झाली. याचा परिणाम देवल सर्कसवर सुद्धा झाला. काही अज्ञात माणसांनी देवल सर्कसची मोठ्या प्रमाणात लूट केली. या सगळ्यांमध्ये लोकांच्या मनात सिनेमा पाहण्यासाठी वेड वाढू लागले. यामुळे सर्कस आणि संगीत नाटक कंपनी अक्षरशः डबघाईला आल्या. बंडोपंत देवल यांनी रंगवलेला विदुषक पाहायला जी गर्दी आधी व्हायची, ती गर्दी ओसरली. सर्कशीच्या तंबूत शुकशुकाट झाला आणि अखेर १९५७ साली देवल सर्कस म्हणजेच ग्रेट इंडियन सर्कसवर अखेरचा पडदा पडला. अशा भारतातील सर्कस सम्राटाचे दि.१६ डिसेंबर २००२ रोजी निधन झाले.

# हिवाळ्यात घ्या सकस आहार...

आधुनिक केसरी



हिवाळ्यात आपल्या आहाराच्या सवयी बदलल्यामळे वजनही वाढू शकते. हिवाळा हा आरोग्यात सुधारणा करण्याचा ऋतु आहे. तसेच या दिवसात शरीरातही अनेक बदल होतात. यामुळे आरोग्याची खूप काळजी घ्यावी लागते. यासाठी योग्य आहार फायदेशीर ठरतो. थंडीत शरीराचे तापमान टिकवून ठेवण्यासाठी शरीर जास्त ऊर्जा वापरते. यामुळे सतत भूक लागते. सतत भूक लागल्याने आपण गरजेपेक्षा जास्त खातो. म्हणूनच आहाराकडे जास्त लक्ष द्यायला हवे. तर पाहू या थंडीत कोणता आहार योग्य ठरतो ते.. रोजच्या अन्नपदार्थात पुरेशा प्रमाणात पोषण तत्त्वाचा समावेश करणाऱ्या आहाराला संतुलित आहार असे म्हणतात थंडीत मिळणारे लाल गाजर, नवलकोल अशा भाज्या पौष्टिक तर असतात. पण त्यामुळे थंडीपासून रक्षणही होते. थंडीतल्या सर्दी, खोकला, फ्लू अशा आजारांना या भाज्यांच्या सेवनाने दूर ठेवता येते. ग्रीन टीचे सेवनही थंडीत उपयुक्त ठरते. कारण ग्रीन टीमध्ये भरपूर अँटी ऍक्सिडंट्स असतात. यामुळे अनेक बॅक्टेरियांचा प्रभाव कमी होतो. तसंच रोगप्रतिकारक शक्ती वाढायला अँटीऍक्सिडंट मदत करतात. हिवाळ्यात लसूण खाणं चांगले. लसणामुळे शरीराला ऊर्जा मिळते तसंच रोगप्रतिकारक शक्तीही वाढते. गरम दुधात मध घालून प्यायल्याने शरीरात उष्णता निर्माण होते. थंडीत दुधात सारखाऐवजी मध घालावा. हिरव्या भाज्यांमधली अ आणि क ही जीवनसत्त्वं थंडीत आरोग्यासाठी लाभदायी ठरतात. संत्री, द्राक्षं अशी फळांमध्ये क जीवनसत्त्वं असतं. यामुळे त्वचेचं पोषण होतं. कोलेस्टरॉल कमी करण्यासोबतच ही फळं चयापचय क्रिया ही वाढवतात. या दिवसात प्रथिनयुक्त आहार घ्यावा. ब्रेड, पांढरा भात असे पदार्थ टाळावे. गोड पदार्थ, शीतपेय, दुग्धजन्य पदार्थ याचं सेवनही प्रमाणातच करावं. सर्दी, खोकला असेल तर दुग्धजन्य पदार्थ टाळावेत.

**-डॉ. किशोर झुटे पाटील (होमिओपॅथीक तज्ञ)**

# 'मस्तानी'

आधुनिक केसरी

**मस्तानीचे व्यक्तिमत्त्व नेमके कसे होते? ती कायम गैरसमजांच्या झाकोळाखाली का राहिली? बाजीरावांचे असामान्यत्व या ना त्या कारणाने सिद्ध होत राहील. परंतु मस्तानीचे काय? मस्तानीबद्दल तिरस्कार मात्र तिच्या मृत्यूनंतरही संपला नाही. 'श्रीमंत पेशवे बाजीराव-मस्तानी' या 'ई टी. व्ही. मराठी' वरील मालिकेतून सध्या तिच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला गेला. मस्तानीच्या अगम्य व्यक्तिरेखेचे रहस्य उलगडण्यासाठी या मालिकेच्या लेखकाने सखोल संशोधन केले आहे. या लेखकाचा, मस्तानीचे व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवणारा लेख-**



उर्दू साहित्याचा, कुराणाचाही तिचा अभ्यास होता. वैभवात ती राहिली होती. गजान्तलक्ष्मीचा अनुभव तिला होता. तिच्या पिखादीला ( अंगरखा ) गुंडी म्हणून हिरे लावण्यात येत असत आणि हे हिरे त्या काळात लाख लाख रुपये किमतीचे असत.

अशा या लाडक्या, राजकन्येचा मस्तानीचा खांडा पद्धतीने बाजीराव पेशवे यांच्याशी विवाह झाला. छत्रसाल राजाने त्या वेळी बाजीरावांना साडेतेहतीस लाखांचा जहागिरीचा प्रदेश व पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणीतील तिसरा हिस्सा भेट दिला. ही भेट म्हणजे बुंदेल खंडावर आक्रमण करणाऱ्या महमंद बंगषाला बाजीरावांनी पराभूत केल्याची कृतज्ञता होती. विशेष म्हणजे या विवाह सोहळ्यास पिलाजीराव जाधव, नारोशंकर, तुकोजी पवार, राणोजी शिंदे, गोविंदपंत खेर, दावलजी सोमवंशी असे मातब्बर मराठा सरदार होते. मस्तानीच्या लग्नाच्या निमित्ताने छत्रसाल राजाने मराठे व बुंदेला ही सोयरीक निर्माण केली. बाजीरावांचाही या विवाहामागील हेतू पाहिला तर मस्तानी लावण्यवती होती, एवढाच नव्हता, तर बाजीरावांनी तो एक राजकीय व्यवहारच केला होता. बाजीरावांचे दिल्ली हे निश्चित लक्ष्य होते आणि त्यासाठी त्यांना बुंदेल खंडासारखे संपन्न आणि मोगलांचे शत्रूराज्य कायम आपल्या बाजूने राहणे गरजेचे होते. ही गरज बाजीरावांनी ओळखली होती. पुढे पुढे मात्र या व्यवहारात भावनिक जवळीक निर्माण झाली. छत्रसालांनी बाजीरावांना आपला मुलगाच मानले. छत्रसालाच्या मृत्यूनंतर बाजीरावांचे सांत्वनपत्र उपलब्ध आहे. त्यात ते छत्रसाल पुत्रास म्हणतात, 'हाल मालुम भयो, श्री श्री श्री महाराज ककाजू साहिब को वैकुंठवास हो गयो, बडी भारी रंज भयी.' 'महाराजने हम कौ लडम्का कर कै मानो है, सो मैं वही तरह आप को अपनौ भाई समझे हो.' पत्राची तारीख आहे शनिवार, २३ सप्टेंबर १७३२. सदर पत्रातून बाजीरावांचा आणि मस्तानीच्या परिवाराबद्दलचा जिव्हाळा किती होता, हेच दिसून येतं. बाजीरावांनी केवळ सौंदर्यवती मस्तानीला पुण्यात आणले नाही, तर त्यांनी मस्तानीसोबत प्रणामी पंथाची भेदाभेदातीत निरामय प्रेमतत्त्वाची, अनोखी जीवनदृष्टीही आणली होती. हा नाही म्हटला तरी पुण्यातील लोकांना धक्काच होता आणि आव्हानही. त्यातच बाजीराव-मस्तानी यांच्या परस्परासंबंधीच्या निष्ठा फारच पक्क्या होत्या. परस्परांतील प्रेमही अतूट होते. सुरुवातीची तीन वर्षे मस्तानीची ठीक गेली. त्यातील निजामभेट, कोकण मोहीम सात-आठ महिने. त्याअगोदर डबईचे युद्ध आणि नंतर उत्तरेची मोहीम. म्हणजे पावसाळ्याचे चार महिने सोडले तर मस्तानीला रायांचा सहवास असा नव्हताच. पेशवे कुटुंबाचेही तसे दुर्लक्षच होते. एक रखेल या पलीकडे मस्तानीचे अस्तित्व पेशवे कुटुंबाच्या लेखी नव्हते.परंतु मस्तानीस जसा समशेर हा मुलगा झाला, तसे पेशवे कुटुंबास एका भीतीने ग्रासले की, कदाचित मस्तानीचा वंशज पेशव्यांच्या गादीवर हक्क सांगेल. झाले त्याच दिवसापासून मस्तानीच्या खच्चीकरणास सुरुवात झाली. त्यात तिला नाची कंचनी ठरविले. तिला मद्य पिणारी- प्राशनी ठरविले. एवढेच नाहीतर या संकटास कायमचे पंगू करण्यासाठी बाजीराव-मस्तानी हा संबंध वैवाहिक नाही, ती पत्नी नसून रखेल आहे, **क्रमशः**

**प्रताप गंगावणे**

# आरोग्यदायी गूळ

आधुनिक केसरी

थंडीच्या दिवसात गुळ खाणे सर्वांना आवडते कारण गुळात गर्मी जास्त असते. गुळ खाल्ल्याने शरीरात गर्मी वाढते. पोटाच्या सर्व विकारांवर गुळ अत्यंत फायदेशीर आणि गुणकारी आहे. आयुर्वेदानुसार गुळातील तत्वांमुळे शरीरातील ॲसिड नाश पावते. रोज गुळ खाल्ल्याने तुमचे स्वास्थ्य उत्तम राहते. ऋतुमानानुसार आहार हे आपल्या भारतीय खाद्यसंस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. सणासुदीच्या निमित्ताने आरोग्यदायी पदार्थांचा आहारात समावेश केलेला आढळतो. आता थंडीच्या दिवसात आवर्जून गुळाच्या पदार्थांचा आहारात समावेश केला जातो. पण नेहमीच गुळाचे सेवन केल्यास आरोग्यासाठी ते फायदेशीर ठरते. भारतीय संस्कृतीत घरी येणाऱ्याला विशेषतः उन्हातून आल्यास गूळ आणि पाणी देण्याची प्रथा आहे. गुळाचे आरोग्याला असणारे अनेक फायदे सिद्ध झाले आहेत. चला तर मग जाणून घेऊया गुळाचे कमालीचे फायदे.

**रोज गुळ खाल्ल्याने होणारे फायदे-**

रोज गुळ खाल्ल्याने पचन क्रिया सुरळीत राहते , तसेच तुमच्या पोटात कधीच गॅस होणार नाही. गुळ महिलांच्या मासिक पाळीतही फायदेशीर ठरतो. मासिकपाळी आल्यावर पोट दुखी होते अशात गुळ खाल्ला तर पोट दुखायचे त्वरित थांबेल. रोज गुळाचे सेवन केल्याने त्वचेला तेज येते आणि चेहऱ्यावरील पुरळ सुद्धा कमी होऊ लागतात. सर्दी, खोकला येत असेल तर गुळाचा लाडू बनवून किंवा चहामध्ये गुळ टाकून प्यायल्याने आराम मिळतो. गुळ खाल्ल्याने तुम्हाला थकवा कधीच नाही जाणवणार आणि शरीरात नेहमी ऊर्जा राहील. गुळात कुठल्याही ॲलर्जी विरुद्ध लढणारी तत्व असतात आणि दम्याच्या पेशंटला त्याचा खूप फायदा होतो. गुळाला आल्यासोबत गरम करून खाल्ल्याने गळ्याचे आजार दूर होतात. गरम दुधाबरोबर **गूळ खायचे फायदे-** गरम दुधाबरोबर गूळ खाणं तब्येतीसाठी चांगलं आहे. हे दोन्ही एकाच वेळी खाल्ल्यामुळे मोठ्यातला मोठा आजारही बरा होऊ शकतो. रोज दुध प्यायल्याचे फायदे तसे सगळ्यांनाच माहिती आहेत, पण गरम दुधाबरोबर गूळ खाल्ल्यामुळे वजन कंट्रोलमध्ये राहतं, तसंच त्वचेला निखार येतो. दुधामध्ये मोठ्या प्रमाणावर व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी आणि डी तसंच कॅल्शियम, प्रोटीन आणि लॅक्टिक ॲसिड असतं. तर गुळामध्ये सुक्रोज, ग्लुकोज, कॅल्शियम, फॉस्फरस, लोखंड असतं. शरीरातलं अशुद्ध रक्त साफ होतं. गुळामध्ये असलेल्या गुणांमुळे शरिरातील अशुद्ध रक्त शुद्ध होतं. त्यामुळे गरम दूध आणि गूळ खाल्ल्यामुळे तुम्ही आजारांपासून दूर राहू शकता. लठ्ठपणा नियंत्रणात ठेवतं गरम दुधामध्ये साखर घालण्याऐवजी गूळ घातला तर लठ्ठपणा नियंत्रणामध्ये राहायला मदत होते. पोटाचे विकार दूर करतं

गरम



दूध

आणि गुळाचं

सेवन केल्यामुळे पोटाचे आणि पचनाचे विकार दूर होतात. **सांधेदुखी वर लाभदायी** -गूळ खाल्ल्यामुळे सांधेदुखीला आराम मिळतो. रोज गूळ आणि आल्याचा तुकडा एकत्र करुन खाल्ला तर सांधे मजबूत होतात. **त्वचा होते मुलायम-** गरम दूध आणि गूळ खाल्ल्यामुळे त्वचा मुलायम होते. एवढंच नाही तर यामुळे केसही मजबूत होतात. थकवा दूर होतो – गूळ खाण्यानं शरीराला ऊर्जा मिळते. थकवा दूर होतो. थकवा, कमजोरी जाणवत असेल तर जरूर गूळ खावा. **रक्ताची कमतरता भरून निघते** - गूळ हा लोहाचा मोठा स्रोत आहे. तुमचं हिमोग्लोबिन कमी झाले असेल तर रोज गूळ खाण्यानं तात्काळ फायदा होतो. गूळ खाण्यानं शरीरातील लाल पेशींची संख्या वाढते. त्यामुळे गर्भवती महिलांना डॉक्टर गूळ खाण्याचा सल्ला देतात.

**रक्तदाब नियंत्रणात राहतो** - गुळामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. विशेषतः उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या लोकांना गूळ खाण्याचा सल्ला दिला जातो.

**हाडं मजबूत होतात** - गुळात कॅल्शियम आणि फॉस्फरस यांचं प्रमाण अधिक असतं. हाडांना बळकट करण्यात हे दोन्ही घटक महत्त्वाचे असतात. त्यामुळे गूळ खाण्यानं हाडांसाठीही लाभदायी ठरते.

**शरीर कार्यक्षम राहतं** - गुळामुळे शरीर मजबूत आणि कार्यक्षम राहते. शरीर ताकदवान बनवण्यासाठी दुधात गूळ घालून घेणे उपयुक्त ठरते. दुध आवडत नसल्यास एक कप पाण्यात पाच ग्रॅम गूळ, थोडासा लिंबू रस आणि काळे मीठ घालून प्यायल्यास थकवा दूर होईल.

**सर्दीवरही गुणकारी** – सर्दी-पडसं दूर करण्यासाठीही गूळ लाभदायी ठरतो. काळीमिरी आलं आणि गूळ मिसळून खाल्ल्यास सर्दी-पडसं कमी होतं. खोकला येत असेल तर साखरेऐवजी गूळ खाणं लाभकारक ठरतं. आल्याबरोबर गूळ गरम करून खाल्ल्यास घशातील खवखव, जळजळ दूर होते.

**डोळ्यांसाठीही लाभदायी** – गूळ खाल्ल्यानं डोळ्यांची क्षीणता कमी होते. दृष्टी सुधारण्यासही मदत होते.

**बुद्धीही वाढते** - तुमचा मूड सुधारण्यासाठीही गुळाची मदत होते. मायग्रेनचा त्रास असेल तर रोज गूळ खाण्यानं फायदा होतो. नियमितपणे गुळाचे सेवन केल्यास तुमचा मेंदूही तरतरीत राहतो, स्मरणशक्तीही चांगली राहते.

**त्वचेसाठीही उपयुक्त** – त्वचा तुकतुकीत राहण्यासाठी गुळ उपयुक्त ठरतो. शरीरातील हानिकारक विषद्रव्ये बाहेर काढून टाकण्यात गूळ मदत करतो त्यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारते. मुरमांच्या समस्येपासून सुटका हवी असेल तर दररोज गूळ खाणे उपयुक्त ठरते.

**आवाज चांगला राहतो** - गूळ आणि आलं गरम करून खाल्ल्यास घशातील खवखव, जळजळ दूर होते. त्यामुळे आवाज बसत नाही.

# चहाचे चाहते

आधुनिक केसरी

आज १५ डिसेंबर जगातील सर्व देशात जागतिक चहादिन उत्साहाने साजरा केला जातो.

तसं तर भारतात इंग्रज राजवटीसोबत चहा या पेयाने प्रवेश केला. प्रथम श्रीमंतांच्या घरचा चैन असलेला चहा बघताबघता सर्वसामान्य माणसाचा दैनंदिन गरजेचा कधी झाला हे कळलेच नाही. नुसत्या नावाच्या उच्चाराने आपल्याला तरतरीत करणारे पेय म्हणजे चहा होय. जगभरातील अनेकांची सकाळ चहाच्या वाफाळत्या कपाशिवाय अशक्य आहे. चहाशिवाय सकाळ म्हणजे उदास उदास किंवा *सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या अशी ही बिकट अवस्था. मित्रांनो व भगिनींनो मी दहावीपर्यंत चहाची चव बघितली नव्हती. शाळेय शिक्षण पूर्ण झाल्यावर मी चहा प्यायला सुरुवात केली. चहा असा पेयप्रकार की जो तुम्ही कुठेही गेलात तरी तो तुमच्या स्वागताला हजर असतो. सुखाच्या प्रसंगाची रंगत वाढवणारा , दुःखाच्या प्रसंगी काळजी घेणारा, आळसाला चुटकीसरशी दूर पळवून लावणारा चहा हा प्यायलाच हवा.

आपल्या परभणी शहरात चहाप्रेमी व्यक्तीसाठी खालील उपहारगृहात चहा उत्कृष्ट चवीचा उत्तम मिळतो.

१) श्रीपांडुरंगकृपा हॉटेल -विसावा कानर, परभणी.

२) कृष्णा उडपी- विसावा कानर परभणी.

३) दिपक टी सेंटर - खास अद्रकचा -- लक्ष्मीनारायण मंदिर समोर.

४)अप्पा पेढेवाले उपहारगृह - गांधी पार्क .

५) अपना कानर येथील सर्व उपहारगृह.

काही मंडळी मधुमेह झाल्यामुळे तब्येतीच्या काळजीने साखरेशिवाय चहा घेतात. तर काहीजणाना गोडमिट्ट चहा लागतो.

आपल्या येथे घरात अथवा दुकानात मंडळी चहा घेत असतील त्यावेळी आगंतुक कोणी आला तर त्याला चहाचा आग्रह केला जातो.

मी मागच्या महिन्यात दिवाळीनिमित्त रेल्वेने



औरंगाबादला जात होतो त्यावेळेस प्रवासाचा प्रचंड शीण आला व चहाची तल्लफ आली . परतूर रेल्वे स्थानकावर गरमागरम वाफाळलेला चहा घेतला व प्रवासाचा सर्व शीण गेला.

भारतात तर चहा हा गरीब घरापर्यंत पोहचला. कॉफी मात्र श्रीमंतांच्या घरातच राहिली. कॉफीहाऊसप्रमाणे आता शहरात चहा हाऊस उघडत आहेत. इराणी हॉटेलच्या टपरीपासून सुरू झालेला चहाचा प्रवास आज चहाहाऊसपर्यंत आला आहे. मागील दोन वर्षांपासून चहाप्रेमीसाठी महानगरातील नावाजलेल्या चहाची स्टॉल परभणीत सुरू झाली होती. त्यात खालील प्रतिष्ठाने सुरू झाली ती --

अमृततुल्य येवले चहा झक्कास चहा नंबर १ साईबा चहा मित्रांसोबत गप्पांची मैफिल जमावी व अमृततुल्य चहाचा कप हातात यावा मग तो चहा घेताना ब्रम्हानंद मिळतो तो शब्दात वर्णन करणे अशक्य आहे. असाच योग दोन वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी आला होता.

मी , संदीप, गणेश आम्ही वर्गमित्र ॲड.नागेश उबाळे याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मी , संदीप, गणेश गेलो होतो त्यावेळी येवलेचा अमृततुल्य चहाचे प्रतिष्ठान नविनच परभणीत सुरू झाले होते... मग काय मित्र .. अमृततुल्य चहा....आणि गप्पांची मैफिल खूप छान योग आला होता. भारतातील चहाचे चाहते पाहून हिंदी चित्रपटसृष्टीलाही इसवी सन १९८३ मध्ये चहाने भुरळ घातली होती. सौतन या हिंदी चित्रपटातील शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है इसीलिए मम्मी ने मेरी, तुम्हें चाय पे बुलाया है.... हे गीत दिग्दर्शकाने खूबीने खास चित्रीकरणासह चित्रपटात सादर केले होते. जागतिक चहा दिनाच्या सर्व चहाप्रेमींना हार्दिक शुभेच्छा.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादीच्या गटबाजीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## प्रकाश सोळंके जिल्हाध्यक्ष जालना

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** उपविभागीय अधिकारी परतुर यांच्यामार्फ दि.१६/१२/२०२२ रोजी मुख्यमंत्री यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देऊन निवेदनात पुढे म्हटले आहे कि जालना जिल्ह्यातील खरीप उत्पादक शेतकऱ्यांना दुष्काळ मदती पासून वंचित ठेवू नका जालना जिल्ह्यासह परतूर मंठा तालुक्यात लहरी  पाऊस झाल्यामुळे खरीप पिकांचे एकरी ३ किंटल कापूस कमी, एकरी ४ किंटल सोयाबीन कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, म्हणून सरसकट अनुदान मदत करण्यासाठी कार्यवाही करण्या यावी निवेदनात म्हटले आहे कि जालना जिल्ह्यातील खरीप उत्पादक शेतकऱ्यांना दुष्काळ मदतीपासून वंचित ठेवु नये, जालना जिल्ह्यासह परतूर मंठा तालुक्यात लहरी अतिवृष्टी पाऊस झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर या परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये कमी अधिक पावसामुळे खरीप पीकांचे खूप मोठे नुकसान होऊन उत्पादनात घट झाली आहे. करण हंगामी पाऊस व परतीचा पाऊस लहरी सतत पाऊस झाल्यामुळे उत्पादनात घट झाली आहे, एकरी  क्विंटल सोयाबीन व्हायला पाहिजे होते त्यात ३/४ क्विंटल घट झाली आहे एकरी सोयाबीन पिकाचे ८ ते ९ हजार रुपये नुकसान झालेले आहे, तसेच आदिकच्या पावसामुळे कापसाचे उत्पादन ३०/३५ टक्याने घटल्यामुळे नुकसान झाले आणि कापूस एकरी ९ ते १० क्विंटल व्हायला हवा होता पण कधी कमी तर कधी जास्त पाऊस पडल्यामुळे मोठे नुकसान होऊन ३ /४ क्विंटलच्या उत्पादनात घट होऊन जवळपास एकरी किमान २२ हजार रुपये नुकसान झालेले आहे, यावर्षीच्या २०२२ या वर्षामध्ये लहरी पाऊस पडल्यामुळे सगळ्याच खरी पिकांच्या उत्पादनात ३० ते ३५ घट होऊन शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे, पारंपारिक पद्धतीने अनेक वर्षापासून उघड्या डोळ्यांनी घाट्याचा धंदा करणारी देश सेवा म्हणून काम करीत असलेला शेतकरी याला राज्य आणि केंद्र सरकारने अडचणीच्या वेळी मदत करायला हवी मदत केली तरच शेतकऱ्यांना सहकार्य होईल अन्यथा हळूहळू एक एक दिवस शेतकरी शेती पासून बाजूला गेल्याशिवाय राहणार नाही? हि सत्य गोष्ट टाळून चालणार नाही, म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अपेक्षा आहे जालना जिल्ह्यासह परतूर मंठा तालुक्यातील खरीप उत्पादक शेतकऱ्यांना दुष्काळ मदती पासून वंचित ठेवु नका सरसकट अनुदान देऊन मदत केलीच पाहिजे.जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वंचित ठेवु नका सरसकट जिल्ह्यासह परतूर मंठा तालुक्यातील खरीप पिकाचे मोठे नुकसान झालेले आहे ओला सरासरी पेक्षा लहरी पाऊस पडल्यामुळे उत्पन्नात घट होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले अनुदान आर्थिक सहकार्य मिळावे दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य सरकार आर्थिक नुकसान भरपाई मदत करणार होते मग काय झाले? आठ-दहा दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर आर्थिक मदत जमा करा नसता खरीप उत्पादक शेतकऱ्यांना घेऊन जालना जिल्ह्यासह परतूर मंठा तालुक्यात रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात आला.







# ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फागणे गावात पोलिसांचा रूट मार्च

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** फागणे येथे निवडणूक काळात गडबड, गोंधळ व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तालुका पोलीस प्रशासनावतीने रूट मार्च काडून नागरिकांना सूचित करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी, असे आवाहन तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अनिल महाजन यांनी केले आहे. दरम्यान, ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावात जादा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असल्याची माहिती ही त्यांनी दिली.

# सुषमा अंधारे यांची हकालपट्टी करा, नाशिकमध्ये वारकऱ्यांची दिंडी यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सुषमा अंधारे विरोधात राज्यभरात वारकरी चांगलेच संतप्त झाले आहेत. याचे पडसाद नाशिकमध्ये देखील उमटले असून साधू संतांबद्दल अपमानजनक शब्द वापरल्याचा आरोप करत वारकऱ्यांनी नाशिकमध्ये दिंडी यात्रा काढली आहे. सुषमा अंधारे यांची पक्षातून हक्कालपट्टी करण्याची मागणी दिंडीतील वारकर्यांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यात सुषमा अंधारेंनी हिंदू देवी-देवता आणि साधु-संताबाबत आक्षेपार्ह विधानं केली आहे. त्यामुळे वारकरी महामंडळ अंधारेविरुद्ध आक्रमक झाला आहे. राज्यभरातून वारकरी संप्रदाय निषेद आंदोलने केली जात आहेत. आळंदीमध्ये तर प्रेतयात्रा काढून वारकरी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर नाशिकमधील वारकऱ्यांनी एकत्र येत दिंडी यात्रेचे आयोजन केले होते. या दिंडीच्या माध्यमातून सुषमा अंधारे यांचा निषेध करण्यात येत आहे. नाशिकच्या काळाराम मंदिरापासून युवा यात्रेला प्रारंभ झाला असून गोदावरी पटांगणावर रामकुंडानजीक या यात्रेचा समारोप होणार आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी एक वक्तव्य हे केलं होतं. यात साधू संतांचा अपमान केल्याचा आरोप वारकऱ्यांकडून केला जात आहे. यामुळे नाशिकमध्ये काळाराम मंदिर ते रामकुंडापर्यंत निषेध दिंडी काढण्यात आली. सुषमा अंधारे यांनी वारकरी संतांबद्दल आणि हिंदू देवतांबद्दल आक्षेपार्य विधान केले असून वारकरी संतांचा अपमान केल्याचे दिंडीतील वारकरी म्हणाले. राज्यात वारकरी त्यांचा निषेध करत आहोत, हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंचे शिवसेनेला विनंती आहे, उद्धव साहेबांना विनंती आहे, तात्काळ काळ सुषमा अंधारे यांना पक्षातून काढा, अन्यथा उद्धव ठाकरे यांचा देखील निषेध करण्यात येईल, असा इशारा यावेळी वारकऱ्यांकडून देण्यात आला. दिंडीतील वारकरी म्हणाले, सुषमा अंधारेवर वारकरी संप्रदायाकडून प्रचंड संताप महाराष्ट्रातून व्यक्त करण्यात करण्यात येत आहे. ज्या पद्धतीने अंधारे यांनी वक्तव्य केले आहे, त्यास कुठल्याही प्रकारचा आधार नाही. पंचवटी पोलीस स्टेशनला रवाना होऊन वारकरी पंचवटी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करणार आहेत.

# मुंबई पालिका निवडणुकीपूर्वी अरुण गवळीला पॅरोल मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काही दिवसांपूर्वी मुलाच्या लग्नानिमित्त मिळालेल्या अभिवचन रजा (पॅरोल) उपभोगून आलेल्या अरुण गवळीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आता संचित रजा (फरलो) देखील मंजूर केली आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत लवकरच मुंबई महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीपूर्वी अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातून दिलासा मिळाला आहे. काही दिवसांपूर्वी मुलाच्या लग्नानिमित्त मिळालेल्या अभिवचन रजा (पॅरोल) उपभोगून आलेल्या गवळीला नागपूर खंडपीठाने आता संचित रजा (फरलो) देखील मंजूर केली आहे. कारागृह विभागाचे उपनिरीक्षकांनी त्याचा अर्ज फेटाळल्याने त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणी न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी यांच्या समक्ष सुनावणी झाली. रजा मंजूर केल्यास गवळी मुंबई महापालिका प्रभावित करु शकतो, कारणावरुन कारागृह या अरुण गवळी विभागाचे उपनिरीक्षक (पूर्व) यांनी गवळीचा संचित रजेचा अर्ज नामंजूर केला होता. त्यामुळे, त्याने उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. मात्र, ठोस पुरावे सादर न केल्यामुळे संबंधित कारण काल्पनिक असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले. गवळीला त्याच्या पात्रतेनुसार आणि आवश्यक अटींसह संचित रजा देण्यात याव्या. त्याला या निर्णयाची प्रत मिळाल्यापासून एक आठवड्यात सोडण्यात यावे, असे न्यायालयाने सांगितले. तसेच, गवळीला यापूर्वीही अनेकदा अभिवचन आणि संचित रजेवर सोडण्यात आले. दरम्यान, त्याने नियमांचे काटेकोर पालन केले. त्याने एकदाही अवैध कृती केली नाही, असे न्यायालयाने रजा मंजूर करताना स्पष्ट केले.

# नाशिक येथील बौद्धधम्म मेळाव्या संदर्भातील नियोजन बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** नाशिक येथील धम्म मेळावा बाबत नियोजन बैठकीचे आवाहन नगरसेवक गणेश सावळे यांच्या वतीने करण्यात आले होते सदर बैठक संध्याकाळी संपन्न झाली. सदर बैठकीस शिरपूर शहर तसेच तालुक्यातून मोठ्या संख्येने धम्म बांधव उपस्थित होते. सदर बैठकीस सर्वप्रथम गणेश  सावळे यांनी धम्म मेळाव्याची रूपरेषा व नियोजना संदर्भात माहिती दिली. तदनंतर आयु. ज्वाला मोरे यांनी आपले विचार मांडले धम्म मेळाव्याच्या माध्यमातून समाज संघटित होत आहे, असे त्यांनी नमूद केले आयु.प्रा. राजू पवार यांनी समाजातील सक्षम लोकांनी समाज एकत्रित होण्यासाठी लक्ष केंद्रित करावे असे सांगितले.आयु. सुनील बैसाणे यांनी धम्ममेळाव्यात सहभागी होवून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होवूया असे आवाहन केले. नगरसेवक पिंटू भाऊ शिरसाट यांनी सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने मार्गदर्शन पर सूचना केल्या. आयु. अशोक ढिवरे यांनी देखील आपले विचार मांडले. सदर बैठकीस आयु रमेश वानखेडे,अशोक ढिवरे,आयु. हिम्मतराव सैंदाणे,बापू इंदासे, विकी ढिवरे, महेंद्र कढरे, विजय मरसाळे, चंद्रकांत सैंदाणे, राहुल थोरात,रमा थोरात,भारत थोरात,सोनू मोरे,पी एस देवरे, शौकीन कुवर, गौतम कापुरे, सचिन बोरसे, बन्सीलाल शिरसाट, दत्ता थोरात, दिनेश सावळे, आकाश देवरे, कमलेश गंगाराम थोरात,भैय्या वाघ,मच्छिंद्र थोरात, गौतम खैरनार, सिताराम थोरात, जितेंद्र भदाणे, सिद्धार्थ शिरसाट,दिलिप ईंदासराव, भैय्या थोरात, सतीश थोरात, सतीश खैरनार,जगदीश थोरात, पिनू गवळे, बंटी पाटोळे, रोशन थोरात, जितू पवार, गौतम महिरे सर, युवराज पारवा, अविनाश बैसाणे, खंडू महिरे, जितू कापुरे, भीमराव पवार, नवल कढरे, आनंद निकम, किरण कापुरे, मुन्ना थोरात, भरत करंकाळ, लखन शिरसाट, विपुल नगराळे, अंबालाल वानखेडे, दीपक नगराळे,संदीप थोरात, पंकज बाविस्कर, अतुल थोरात, राकेश साहेबराव थोरात, हिम्मत बच्छाव, प्रेम सैंदाणे, मधु थोरात,हितेश इशी, अजय पाटोळे,, स्वयंप्रेरणेने उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन नगरसेवक गणेश भाऊ सावळे व नगरसेवक पिंटू भाऊ शिरसाठ यांनी सर्व उपस्थितांना केले.

# सत्तेसाठी काही पण.....! रणधुमाळी ग्रामपंचायत निवडणूक

## कुणी जावा-जावा, कुणी सासू-सुना तर कुणी चुलते पुतणे; नणंद-भावजय, भावा-भावात रंगला राजकारणाचा फड

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यातील 25 ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणुक होत आसुसून दोन दिवसावर मतदान आले आहे. राजकारण म्हटलं की अगोदर आठवते ती म्हणजे भावकी...! कारण भावकीतला एखादा पुढे जायला लागला की त्याला मागे ओढणारे भावकीतच असतात, याची कित्येक उदाहरणे आपण पाहिली आहेत. छोट्या छोट्या गोष्टींवरुन भावकीमध्ये रुसवे-फुगवे बघायला मिळत असतात. त्याचं कारण तितकंच किरकोळ असतं ते म्हणजे मानपान... तो मिळाला नाही की, भावकी आडवी आलीच म्हणून समजा महाभारतापासून तो आजपर्यंतचा इतिहास आहे.

राज्यात सर्वत्र ग्रामपंचायत निवडणुकीचा धुरळा उडणार असून उमेदवारांच्या प्रचारफेऱ्या, मतदारांसोबत गाठीभेटी व कॉर्नर बैठका घेण्यावर भर दिला जात आहे. विशेष म्हणजे वैजापूर



तालुक्यात ठिकाणी नात्यागोत्यातील लढतीने निवडणुकीत चांगलीच रंगत आणली आहे बऱ्याच गावांमध्ये सासू-सूना, भाऊ-भाऊ, जावा-जावा, एकमेकांसमोर उभे आहेत. घरातील उमेदवार उभे करण्यासाठी पॅनल प्रमुखांची चढाओढ...! वैजापुर तालुक्यातील बर्याच पॅनलमध्ये लढत आहे. दोन्ही पॅनलमध्ये एकाच घरातील सासू-सुनेला उमेदवारी दिली आहे. तर काही ठिकाणी दोन वेगवेगळ्या वॉर्डांमध्ये आपल्या घरातीलच उमेदवार दिले आहेत. यात स्थानिक मुद्दे अधिक चर्चेत आसुसून गावविकासासाठी स्थानिक आघाड्याच निवडणूक लढवत असतात. त्यात भावकीचा वाद असतो. हे सारे जमले की मग पॅनल जमत असते. तिथे कोणी कितीही झेंडा फडकू देत, प्रत्यक्ष निवडणुकीत पक्षापेक्षा स्थानिक मुद्दे अधिक चर्चेत येत असून, तशीच स्थिती तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीत निर्माण झाली आहे. कार्यकर्ते रात्रंदिवस सोशल मीडियावर अपडेट टाकत आहेत. यात गावातील विकास कामांचा आणि भ्रष्टाचाराच्या आरोपात प्रत्यारोपण चित्र मांडले जात आहे. सोशल मीडियावरील प्रचारातून आता कोण बाजी मारणार याची उत्सुकता प्रत्येकाला लागून आहे. निवडणुकीचे चित्र स्पष्ट होताच पॅनल प्रमुख, विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उमेदवारांच्या ग्रामदेवताना श्रीफळ वाढवून प्रचाराच्या धूमधडाक्यात शुभारंभ सुरू केला. कार्यकर्त्यांनी तात्काळ प्रचाराचे फोटो, अपडेट माहितीचा व्हॉट्सऍप फेसबुकच्या माध्यमातून सोशल मीडियावर पोस्ट टाकून प्रचाराला सुरुवात केली आहे. गावगाड्यात राजकीय वातावरण चांगलेच तापू लागल्याने सोशल मीडियावर प्रचाराचा धरळा उडू लागला आहे. यंदा ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका होत असून वैजापुर तालुक्यात 25 ग्रामपंचायती आहे; अनेक

### प्रचारात सोशल मीडियाचावापर ....!

पूर्वीच्या काळी प्रचाराची खूप वेगळी पद्धत होती. उमेदवाराचा प्रभाग, नाव, चिन्ह भिंतीवर काढले जायचे. कालांतराने प्रचार पद्धतीत बदल होत गेल्यामुळे आता प्रचारात थेट सोशल मीडियाचा वापर होऊ लागला आहे. निवडणूक आयोगाने यावर कितीही मर्यादा घालण्याचा प्रयत्न केला. सध्या तरी सोशल मीडियावरून प्रचार रोखणे अशक्य झाले आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून सोशल मीडिया यज्ञ धगधगू लागला आहे.

गावात सध्या सोशल मीडियावर प्रचाराचा रंग तापू लागला आहे. व्हॉट्सऍप, फेसबुकचा वापर तरुण वर्गाच्या माध्यमातून सोशल मीडिया मोठ्याप्रमाणात चालवला जातो. बहुतांशी गावांमध्ये आपल्या गावातील तरुणांचा व्हाट्सअप ग्रुप ही बनवला आहे. या व्हॉट्सऍप ग्रुपच्या माध्यमातून तरुण वर्गाने विविध प्रकारचा प्रचार सुरू केला आहे. ग्रुपच्या माध्यमातून गावाची समस्या व सर्वांगीण विकास या संदर्भातील योग्य उमेदवार कोण याची जनजागृती केली जात आहे.

# वेळीच करा हरभरा पिकावरील घाटेअळीचे व्यवस्थापन; कृषी सहायक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सद्या परिस्थितीत परतीचा पाऊस व ढगाळ वातावरण असल्यामुळे हरभरा पिकावरील घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच अंधारीरात्र असल्यामुळे घाटेअळीचे पतंग मोठ्या प्रमाणावर अंडे देतात. या सर्व बाबी घाटेअळीस पोषक असल्यामुळे सध्या घाटेअळीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात होऊ शकतो. बऱ्याच ठिकाणी या अळीने प्रादुर्भाव करण्यास सुरुवात केली आहे. ही कीड बहुभक्षी असून विशेषतः पिक फुलोरा करावी. आणि प्रामुख्याने घाटे अवस्थेत नुकसानकारक असते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने व फुले कुरतडुन खातात. घाटे लागल्यानंतर अळ्या ाेएट ५ एसजी ४.४ ग्रॅम किंवा फ्ल्युबेन्डामाईड घाटे कुरतडुन त्यास छिद्र पाडुन डोके आत खुपसुन आतील दाणे खातात. साधारणतः एक अळी तीस ते चाळीस घाट्यांचे नुकसान करु शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था व प्रथम अवस् थेतील अळी अवस्था असल्यामुळे वेळीच शेतकरी बंधूनी आपल्या पिकाची पाहणी करून वेळीच उपाययोजना



करावी, असे आवाहन मानसिंग भोळे कृषी सहायक, हेमंत देशमुख कृषी पर्यवेक्षक सोयगाव कृषी विभागाच्या वतीने केले आहे. हरभरा पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन :- शेतकऱ्यांनी हरभरा पिकांची कोळपणी किंवा निंदणी करुन पिक तणविरहित ठेवावे तसेच घाटेअळीच्या मोठ्या अळ्या हाताने वेचून त्यांना नष्ट करावे. घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टरी जमिनीपासुन १ मिटर उंचीवर लावावेत. कामगंध सापळयामध्ये ८ ते १० पतंग प्रति सापळा सतत २ ते B दिवस आढळल्यास किटकनाशकाची फवारणी करावी. शेतामध्ये पक्षी बसण्यासाठी पिकाच्या किमान एक ते दोन फूट उंचीवर पक्षी थांबे हेक्टरी ५० ते ६० ठिकाणी उभारावेत. यामुळे पक्ष्यांना अळ्यांचे भक्षण करणे सोपे जाईल. पिकाच्या सुरुवातीच्या काळात ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा ऑडिरेक्टिन ३०० पीपीम ५ मिली प्रति लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी. घाटेअळी लहान अवस्थेत असताना एच.ए.एन.पी.व्ही. ५०० एल ई १ मिली प्रति लिटर पाण्यात ५ ग्रॅम निळ टाकून सायंकाळी फवारणी जर किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्यावर आढळून आल्यास इमामेक्टीन बेन्झ- ३९.३५ एससी २ मिली किंवा क्लोरॅनट्रीनीलीप्रोल १८.५ एससी २५ मिली यापैकी एका कीटकनाशकाची प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कीटकनाशकांचे प्रमाण नॅपसॅक पंपासाठी असून पेट्रोल पंपासाठी मात्रा तीनपट वा- परावी. शेतात कीटकनाशकाचे द्रावण तयार करताना व फवारणी करताना चष्मा, हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा तसेच गुटखा, तंबाखु खाऊ नवे व बीडी पिऊ नये. सुरक्षिततेची योग्य ती काळजी घ्यावी. असे आवाहन सोयगाव कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.




औरंगाबाद येथील योगिराज ज्योतिष वास्तु अनुसंधान या संस्थेतर्फे १२ आणि १३ डिसेंबर रोजी आयोजित तिसऱ्या दोन दिवसीय राष्ट्रीय ज्योतिष महाअधिवेशनात ज्येष्ठ साहित्यिक तथा ज्योतिष अभ्यासक उद्धव भयवाळ यांना मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सीमा देशमुख, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पंडित दिनेश गुरुजी ( इंदोर) आणि इतर मान्यवर ज्योतिष तज्ञ उपस्थित होते.



# नंदुरबार पोलीसांनी निभावला माणुसकीचा धर्म..! अंत्यसंस्काराला दिली चार टन लाकडे

आधुनिक केसरी न्यूज

**नवापूर :** गेल्या आठवडयापासून नवापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी लाकडेच नसल्याने स्मशानभूमीत आणलेले मृतदेह ताटकळत ठेवण्यात येत होते.मृतदेहांची हेळसांड होत असलेने मयतांच्या नातेवाईकांसोबतच नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त होत होता.प्रसारमाध्यमांतून याबाबत वृत्त समजताच नंदुरबारच्या जिल्हा पोलीसप्रमुखांनी नवापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना तातडीने हालचाल करण्याच्या सूचना दिल्या. पोलीस अधीक्षकांसह नवापूर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी वर्गणी काढून सुमारे चार टन लाकडे उपलब्ध करून दिली आणि अंत्यसंस्कारासाठी खोळंबलेले मृतदेह मार्गस्थ झाले.नवापूर परिसरात लाकडे उपलब्ध नसल्याने लगतच्या गुजरात राज्यातून पोलीसांनी ही लाकडे उपलब्ध करुन दिली हे विशेष! नंदुरबार पोलिसांनी मानवाच्या अंतिम प्रवासादरम्यान असा वेगळा माणुसकीचा धर्म निभावला आहे.पोलीसांतील या जिवंत माणुसकीचे दर्शन झाल्याने नवापूर परिसरातील मयताच्या नातेवाईकांनी साश्रू नयनांनी पोलीसांना धन्यवाद दिले आहेत. मात्र पोलीस अधीक्षक पी.आर.पाटील, उपअधीक्षक सचिन हिरे, पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे या पोलीस टीमने हे आपले कर्तव्य असल्याचे सांगितले आहे.



# बळीराजावर वातावरणाचा घाला

## रब्बी हंगामाला धोक्याचा इशारा, द्राक्षे पंढरी हादरली

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यात चार ते पाच दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने बळीराजांसमोर येरे माझ्या मागल्या या समीकरणांची पुन्हा स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तालुक्यातील बळीराजांसमोरील अस्मानी संकटाची मालिका केव्हा संपणार हा सवाल आ  वासुन उभा राहिला आहे. सध्या रब्बी हंगाम सुरू असुन पावसांमुळे रब्बी हंगाम जवळपास दिड ते दोन महिने उशीरा सुरू झाला आहे. मागील हंगामात खरीप हंगाम संपे पर्यंत पावसांने आपला लहरीपणा दाखविल्याने खरीप हंगामातील अनेक पिकांची वाट लागली होती. त्यामध्ये सोयाबीन, टमाटे, मका व इतर नगदी पिके भुईसपाट होतांना बळीराजांला डोळ्यातील अश्रू अनावर झाले आहे.  सध्या तीन ते चार दिवसांपासून तालुक्यात वातावरणात मोठ्याप्रमाणांत ढगाळ परिस्थिती  व पाणी मिश्रित दाट धुके व अवेळी पडणारा पाऊस यामुळे रब्बी हंगामातील पिकांना धोक्याची घंटा वाजण्यास सुरुवात झाली आहे.यामध्ये गहू, हरभरा,तसेच विविध प्रकारचा भाजीपाला यांच्या वर विविध रोगाचे आक्रमण होण्याची संकेत सध्या दिसत आहे. पिकांवर रोगाचे आक्रमण होऊ नये म्हणून बळीराजा अत्यंत महागडे औषधे,पावडर फवारणी वर भर देत असल्यामुळे शेतकरी वर्गाच्या खर्चात प्रंचड प्रमाणात वाढ होत आहे. मागील वर्षी सतत पडणारा पाऊस व परतीच्या पावसांने थैमान घातल्याने बळीराजांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याने रब्बी हंगामातील पिके उभे करण्यासाठी शेतकरी वर्गाला तारेवरची मोठी कसरत करावी लागत आहे. परंतु पुन्हा एकदा वातावरणात मोठ्या प्रमाणावर बदल झाल्याने रब्बी हंगामातील मोठ्या मेहनतीने उभ्या केलेल्या पिकांवर संक्रांत निर्माण झाली आहे.



**द्राक्षे पंढरीवर अस्मानी संकट :–** सध्या दिंडोरी तालुक्यातील द्राक्षे बागा जोमात असुन वेळोवेळी बदलणारे वातावरण द्राक्षे पिकांला एकप्रकारे संकटाची मालिका निर्माण करणारे झाले आहे . पावसांतुन वाचविलेल्या द्राक्षे बागा आता भर जोमात असल्याने परंतु चार दिवसांपासून दाटे पाणी मिश्रित धुके , अवेळी पडणारा पाऊस यामुळे बळीराजांच्या माथी यंदाचा द्राक्षे हंगाम एकप्रकारे कसरत ठरत आहे . अत्यंत महागडे औषधे खरेदी करून दिवस रात्र एक करून फवारणी वर जोर देत आहे . सध्या द्राक्षे पिकांमध्ये पाणी व साखर उतरण्यास सुरुवात झाल्याने हे पिक या बदलत्या वातावरणांतुन वाचविण्यासाठी शेतकरी वर्ग मोठी मेहनत करीत आहे .

**हिवाळ्यातील थंडी गेली कोठे :–** रब्बी हंगाम आणि हिवाळा यांचा लाखमोलाचा संबंध असतो . कारण हिवाळ्यातील थंडीवर रब्बी हंगामातील गहू, हरभरा हे अवलंबून असतात . थंडी जोरात असल्यास रब्बी तील पिके व उत्पादन चांगले येते . असा अनेक शेतकरी वर्गाचा अनुभव आहे .परंतु सध्या वातावरण पावसाळी सारखे तयार झाल्याने रब्बी हंगामातील पिक उत्पादन क्षमता घटते की काय अशी भीती शेतकरी वर्गाला वाटु लागली आहे .

# महापुरुषांबाबत वादग्रस्त वक्तव्य; सोलापूर बंद

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** राज्यपालांसह भाजपच्या नेत्यांनी महापुरुषांबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या विरोधात आज सोलापूर बंदची हाक देण्यात आली आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यासह भाजपा नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराज महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याविषयी केलेल्या वादग्रस्त विधानानंतर राज्यातील वातावरण तापले आहे. या विधानाचा निषेध नोंदवण्यासाठी आज सोलापूरात शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाने शहर बंदचे आव्हान केले आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यासह भाजपा नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराज महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याविषयी केलेल्या वादग्रस्त विधानानंतर राज्यातील वातावरण तापले आहे. या विधानाचा निषेध नोंदवण्यासाठी आज सोलापूरात शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाने शहर बंदचे आव्हान केले आहे. या बंदला चांगला प्रतिसाद मिळाला असून, बहुतेक व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली आहे. सोलापूर बंद यशस्वी होण्यासाठी उध्दव ठाकरे शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, माकप, आमदार बच्चू कडूप्रणीत प्रहार संघटना, वीरशैव लिंगायत समन्वय समिती, छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेड आदी संघटना सक्रिय झाल्या होत्या. तर दुसरीकडे बाळासाहेबांची शिवसेना, भाजप आणि मनसे हे राजकीय पक्ष 'सोलापूर बंद' पासून दुर होते. विशेषतः उध्दव ठाकरे शिवसेना आणि बाळासाहेबांची शिवसेना हे दोन्ही पक्ष यानिमित्ताने आमनेसामने आल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाची जबाबदारी वाढली होती.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पूर्ववत करा; धोंडीराम राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शासनाने मागासवर्गीय ज्यात ओ,बी,सी, भटक्या-विमुक्त जाती , इत्यादींचा समावेश होतो अशा विद्यार्थ्यांना नियमित मिळणारी व्यवसायिक  अभ्यासक्रमची शैक्षणिक फिस व शिष्यवृत्ती रद्द केलेली आहे, शिष्यवृत्ती बंद करणे हा या मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय आहे,शासन एकीकडे म्हणते मुलां-मुलींनी उच्च शिक्षण घेऊन स्वावलंबी बनावे तर दुसरीकडे त्यांची शिष्यवृत्ती बंद करते हे योग्य नाही, यामुळे बऱ्याच मुलीं व मुले आपले व्यावसायिक शिक्षण अर्धवट सोडत आहेत,कारण वरील वर्गात मोडणाऱ्या मागासवर्गीय कुटुंबांची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीयआहे,शासनाने एस, सी व एस, टी च्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती चालू ठेवली मात्र  ओ,बी, सी,व भटक्या व विमुक्तांची शिष्यवृत्ती थांबविली हा दुजाभाव अन्यायकारक आहे,यामुळे शिक्षण गळती सुरू होईल,व मुले,मुली उच्च शिक्षण घेणार नाही,शिक्षण घेणे हा घटनात्मक हक्क  शासनाच्या या  धोरणामुळे नाकारल्या जात आहे,हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय आहे, वरील वर्गात मोडणारी कुटुंबे अजूनही  आर्थिक दृष्ट्या खूप मागासलेली आहेत आजही त्यांच्या घरात एकदाच चूल पेटते हे शासनाने जाणून घ्यावे,शासनाने शिष्यवृत्ती बंद न करता ती पूर्ववत चालू करावी अशी अपेक्षा आहे, असे धोंडीरामसिंह राजपूत यांनी सांगितले.

# तालमाधुर्य संगीत क्लासेसच्या माध्यमातून महाराष्ट्रात केला विक्रम : प्रा. राजेश सरकटे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :**  ग्रामीण भागातून मराठवाड्याच्या सांस्कृतिक राजधानीत येऊन अवघ्या ८ वर्षात महाराष्ट्रभर शेकडो कलाकारांनी तालमधुर्य संगीत क्लासेसचे संचालक मास्टर विक्रम पवार यांच्या माध्यमातून विक्रम केला असे प्रतिपादन स्वरसाम्राट संगीत संस्थेचे प्रा राजेश सरकटे यांनी केले. ताल माधुर्य संगीत संस्थेचा आठवा वर्धापन दिन यशवंतराव चव्हाण नाट्यगृह पैठणगेट येथे नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विवेकानंद महाविद्यालयचे नाट्यशास्त्र विभागप्रमुख प्रा दिलीप महालिंगे,  प्रसिद्ध गायिका अनघा काळे, मुंबई येथील गौरी संगीत विद्यालयाचे अनिल गावडे, संजय लीला भन्साळी यांच्या सोबत कार्यरत मुंबईचे शशांक हडकर, निरंजन टकले, संदीप साऊंडचे संदीप काळे, बीड चे सचिन उजगरे, परिवर्तन कॉम्प्युटर्स चे संचालक मधुकर खिल्लारे, विनोद सरकटे यांची उपस्थिती होती. यावेळी प्राध्यापक दिलीप महालिंगे यांनी उपस्थित श्रोत्यांना उद्देशून सांगितले की वाद्य, गायन, डान्स नाट्या सह इतर कलेकडे आवर्जून मुलांना प्रोत्साहन द्यावे. यावेळी तालमधुर्य संगीत क्लासेस च्या पुंडलीकनगर, रामनगर करमाड, टीव्ही सेंटर खडकेश्वरसह विविध शाखेतील विद्यार्थ्यांनी अप्रतिम वाद्य व गायकी ढोलकी सोलोचे सादरीकरण करण्यात आले. रसिकांनी भरभरून व वंसमोर च्या प्रतिसादाने सादरीकरण करण्यात आले. गायक - चेतन चोपडे, अजय देहाडे, अजय जाधव, वृंदा भिसे, भाग्यश्री अभ्यंकर, विकास जाधव,सुमित रोकडे,ताल माधुर्य मधील सर्व शिष्टमंडळाने गायन आणि साथसंगत केली. यावेळी पियानो वादन मंगेश




पवार, निखिल लांडगे , अनिकेत गवळी, उदय पाटील,गणेश चव्हाण यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाच्या शेवटी शशांक हडकर यांनी 'चोंडकं' व 'बगलबच्चा' तर अनिल गावडेव विक्रम पवार  यांनी ढोलकी वर जुगलबंदीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी CA दिगंबर कचरे, लिपणे साहेब, सचिन भुईगळ यांनी मेहनत घेतली.

# दुबार मतदान करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा; सभापती धरमसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य



संस्थांना इतर ठिकाणी मतदान करणारे मतदार ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये तिसऱ्याच ठिकाणी मतदान करत आहेत, व्यापार आणि नोकरीसाठी इतर ठिकाणी वास्तव्यास असलेले आणि त्याठिकाणच्या मतदार यादीत नाव असतानाही पुन्हा गावच्या निवडणुकीसाठी मतदान करणाऱ्या अशा दुबार मतदारावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे. सुशिक्षित मतदारांना स्वतःची नावे दोन मतदार यादीत माहित असतानाही वेगवेगळ्या निवडणुकीत वेगवेगळ्या ठिकाणी मतदानाचा हक्क बजावणे केली आहे.. म्हणजे निवडणुक आयोगाची फसवणुकच असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. औरंगाबाद जिल्ह्यात  ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी सोयगाव तालुक्यात रविवार, दि. १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. ग्रामपंचायत निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर दुबार मतदार मतदानाचा हक्क बजावत आहेत. स्वतःला सुशिक्षित समजणाऱ्या सुजान मतदारांना स्वतःचे नाव वेगवेगळ्या ठिकाणच्या मतदार यादीत असल्याची माहिती असतानाही हे मतदार दर निवडणुकीत सोईप्रमाणे दुबार मतदानाचा हक्क बजावताना दिसतात, असे लोक खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्थेला धोका असल्याचे प्रतिपादन करून दुबार मतदानाचा हक्क बजावणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत यांच्याकडे केली आहे.

अनेक मतदारांची नावे वेगवेगळ्या मतदार याद्यामध्ये आढळून येत आहेत. लोकसभा विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना हे मतदार इतरत्र मतदानाचा हुक बजावून केवळ पैशाच्या मोहापायी गावातील कोणत्याही समस्यांची जाण नसताना हे लोक ग्रामीण भागात ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क बजावणार आहेत.


अनेक कर्मचारी व व्यापारी विशिष्ट कालावधीसाठी गावात वास्तव्यास आहेत, त्यांच्याकडे कायम रहिवाशी पुरावा नसतानाही हे लोक मतदानाचा हुक वेगवेगळ्या निवडणुकीत वेगवेगळ्या किंम ठिकाणी बजावताना दिसतात. अनेकांची दुबार नावे मतदार यादीत असतानाही असे लोक मतदानाचा हक्क बजावणार असतील तर नि त्यांच्या विरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार फौजदारी गुन्हे निवडणुक अधिकाऱ्यांनी दाखल करावेत अशी मागणी माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी तहशिलदार रमेश जसवंत सोयगाव  यांनी केली आहे.तथा निवडणुक अधिकाऱ्यांकडे केली आहे. त्यामुळे दुबार मतदार करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in